MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५
व्ही.पी.एम्.
# दिशा
वर्ष सव्वीसावे/अंक २/फेब्रुवारी २०२५

## संपादकीय

### विज्ञानाच्या प्रगतीत महिलांचा सहभाग

विज्ञान हे विशेष असे ज्ञान आहे. इथे कार्यकारणभाव लागू होतो. प्रयोगाने सिद्ध केलेल्या बाबीच इथे स्वीकारल्या जातात. अंधश्रद्धेला इथे थारा नाही. अशा या विज्ञान शाखेच्या प्रगतीमुळे मानवी जीवन आमूलाग्र बदलून गेले आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे मानवी जीवन सुकर झाले आहे. विज्ञानाच्या या महाकुंडात अनेक देशांतील लोकांनी आपला सहभाग दिलेला आहे. परंतु मोजक्या स्त्रिया वगळता, या प्रगतीत महिलांचा वाटा नगण्य असाच आहे. आपल्या लोकसंख्येत अर्धा वाटा महिलांचा आहे. विज्ञानाच्या प्रगतीत सहभागी होण्यासाठी लागणारी सर्व कौशल्ये त्यांच्यात आहेत. तरीही त्यांचा विज्ञान प्रगतीत सहभाग कमी का? असा प्रश्न पडतो.

महिला विज्ञानात मागे का पडतात? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी अनेक संशोधन प्रकल्प राबविण्यात आले. त्याचबरोबर महिलांचा सहभाग वाढावा यासाठी जागतिक स्तरावर एका संघटनेची स्थापना करण्यात आली. त्या संघटनेचे नाव गॅसॅट (GASAT) असे आहे. जेन्डर ॲण्ड सायन्स अँड टेक्नॉलॉजी (Gender and Science and Technology) या नावाचे ते संक्षिप्त रूप आहे. या संस्थेत वेगवेगळ्या देशांचे सभासद आहेत. प्रगत तसेच अप्रगत देशांत त्यांचे कार्य चालू असते. अनेक ठिकाणी ते संशोधन प्रकल्प राबवित असतात. शाळकरी मुलींपासून विज्ञान क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांपर्यंत सगळ्यांना या संशोधनात सहभागी करून घेतले जाते. मधून मधून या संघटनेच्या परिषदा आयोजित केल्या जातात. त्यात वेगवेगळ्या देशांत आणि वेगवेगळ्या स्तरांवर काम करणारे लोक आपापले अनुभव विशद करतात. त्यांच्या अनुभवावरून असे लक्षात येते की, विज्ञानात मुली मागे पडण्याचे कारण बौद्धिक नसून सामाजिक आहे. बऱ्याच मुलींना विज्ञान आवडते, त्यांना या विषयाचे आपण सखोल ज्ञान मिळवावे अशी इच्छा देखील असते. परंतु कुटुंबातील व्यक्ती आणि शेजारीपाजारी त्यांना विज्ञानाच्या भानगडीत न पडण्याचा सल्ला देतात. विज्ञान आणि गणित घेण्यापेक्षा समाजशास्त्र, भाषा, अर्थशास्त्र असे विषय घेण्यास त्यांना उत्तेजन दिले जाते. काही मुली विज्ञान शाखेतून पदवी घेतात. परंतु त्यातील फारच थोड्या संशोधनाकडे वळतात. बऱ्याच विज्ञान पदवीधर महिला इतर व्यवसाय निवडतात. हे चित्र बदलावे म्हणून गॅसॅट ही संघटना मागील अनेक वर्षे कार्यरत आहे. त्याचे चांगले परिणाम दिसू लागले आहेत.

(मुखपृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

आपण भारताचा विचार केला तर असे लक्षात येते की, स्वातंत्र्यपूर्व काळात विज्ञान शिक्षणाच्या फारशा सुविधा आपल्या देशात नव्हत्या. ज्या सुविधा होत्या त्यांचा मुलींपेक्षा मुलेच जास्त फायदा घेत असत. एवढेच नव्हे तर, संशोधनासारखे कठीण काम मुलींना जमणार नाही असे एक मत समाजात रुजले होते. या मताचा फटका डॉक्टर कमला सोहोनी यांना बसला होता. मुंबईच्या महाविद्यालयातून B.Sc. झाल्यानंतर कमला भागवत हिने बंगलोरच्या इंडियन इन्स्टिटट्यूट ऑफ सायन्स (आय आय एस सी) मध्ये पदव्युत्तर शिक्षणासाठी अर्ज केला होता. तो स्वीकारण्यात आला नाही. दाद मागण्यासाठी ही बाई बंगलोरला संस्थेचे संचालक डॉ. चंद्रशेखर वेंकट रमण यांच्या पुढे जाऊन उभी राहिली. 'आपली संशोधन क्षमता सिद्ध केली तरच प्रवेश मिळेल' असे त्यांनी सांगितल्यावर कमला भागवत हिने ते आव्हान स्वीकारले आणि एक मुलगी चांगली संशोधक बनू शकते हे दाखवून दिले. आपल्या जिद्दीच्या जोरावर तिने केवळ आपले कर्तृत्व सिद्ध केले नसून, आय आय एस सी या प्रथितयश संस्थेत मुलींना प्रवेशाचा मार्ग मोकळा करून दिला. त्यानंतर अनेक मुलींनी या संस्थेतून आपले शिक्षण पूर्ण केले.

स्वातंत्र्यानंतर देशभर विज्ञान शिकविणारी महाविद्यालये सुरू झाली. तोपर्यंत मुलींचे शालेय शिक्षण घेण्याचे प्रमाण देखील वाढले. त्यामुळे विज्ञान शाखेकडे येणाऱ्या मुलींची संख्या वाढत गेली. ६०–७० च्या दशकात मोजक्याच मुली विज्ञान शाखेत दिसायच्या. हे चित्र आता पूर्णपणे बदललेले आहे. असे जरी असले तरी 'विज्ञान संशोधन' हा व्यवसाय म्हणून निवडणाऱ्या मुलींची संख्या अजूनही कमी आहे. ती वाढविण्याची नितांत गरज आहे. त्यासाठी टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राने काही प्रकल्प राबविले होते. या विषयाशी संबंधित असे एक प्रदर्शन होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्रात आयोजित करण्यात आले आहे. हे स्थायी स्वरूपाचे प्रदर्शन असून, यात भारतातील महिलांनी विज्ञानाच्या प्रगतीत जो हातभार लावला त्याची माहिती देण्यात आली आहे. अगदी जुन्या काळातील गार्गी, मैत्रैयी पासून सुरू करून मधल्या काळातील कमला सोहोनी, जानकी अंमल, राजेश्वरी चटर्जी यांची माहिती देण्यात आली आहे. अलीकडच्या काळात अणू संशोधन, अंतरिक्ष संशोधन या क्षेत्रांत देखील महिला तंत्रज्ञांनी आपला ठसा उमटवला आहे. त्या सगळ्या महिला शास्त्रज्ञांची माहिती या प्रदर्शनात देण्यात आली आहे. १९९० च्या दशकात उभारण्यात आलेल्या या प्रदर्शनाला आतापर्यंत शेकडो विद्यार्थिनींनी भेट दिली आहे.

विज्ञान क्षेत्रात महिलांचा सहभाग या विषयाला आता जागतिक महत्त्व प्राप्त झाले आहे. दरवर्षी 'विज्ञान क्षेत्रातील महिला व मुलींचा आंतरराष्ट्रीय दिन' (International Day of Women and Girls in Science) साजरा करण्यात येतो. या संदर्भातला अधिनियम युनोच्या सर्वसाधारण सभेत २२ डिसेंबर २०१५ रोजी पारित करण्यात आला. सर्वांनुमते ११ फेब्रुवारी ही तारीख यासाठी ठरविण्यात आली. त्यानुसार ११ फेब्रुवारी २०१६ रोजी पहिला आंतरराष्ट्रीय दिन साजरा केला गेला. या मालिकेतला दहावा आंतरराष्ट्रीय दिन याच महिन्याच्या ११ तारखेला जगभर साजरा करण्यात आला. या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांच्या माध्यमातून विज्ञानाचे जीवनातील महत्त्व समजावून देऊन महिलांना त्या विषयाकडे आकर्षित करण्याचे प्रयत्न केले गेले. असे प्रयत्न स्थानिक स्तरावर देखील होण्याची गरज आहे असे मला वाटते. विज्ञान क्षेत्रात ज्या महिला यशस्वी झाल्या त्यांच्याबद्दलची माहिती शाळा आणि महाविद्यालयातील मुलींना देण्यात यावी. असे केल्याने त्यांच्यापुढे एक आदर्श निर्माण होईल आणि आपल्या आदर्शवत व्यक्तीसारखे बनण्याचा त्या प्रयत्न करतील.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

व्ही.पी.एम्.

# दिशा

**वर्ष सव्वीसावे/अंक २/फेब्रुवारी २०२५**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

‘दिशा’ प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २९ वे/अंक ८ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | अर्थसंकल्प २०२५ | चन्द्रशेखर टिळक | २ |
| ३) | विनिता तेलंग यांची ‘सूर्यकन्या सावित्री’ कादंबरी | विभावरी बिडवे | ६ |
| ४) | उंटांची अद्‌भूत रम्य दुनिया २०२४ हे आंतरराष्ट्रीय कॅमेलीड्‌सचे वर्ष | सौ. अल्पना बापट | ७ |
| ५) | ओळख नवीन कायद्याची | डॉ. रुपाली जामोदे | १२ |
| ६) | तिळगुळ घ्या तरी कसं म्हणायचं? | जयंत कुलकर्णी | १४ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | १९ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# अर्थसंकल्प २०२५

*चन्द्रशेखर टिळक हे अथतज्ज्ञ म्हणून प्रसिद्ध आहेत. अर्थसंकल्पाबाबत त्यांचे विचार स्पष्ट असतात. आपणही त्यात 'रमून जातो, एवढी ताकद त्यांच्या शब्दांमध्ये, विचारांमध्ये आहे. वाचा तर – संपादक*

आर्थिक वर्ष २०२५-२६ सालासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प १ फेब्रुवारी २०२५ रोजी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतरामन यांनी आपल्या संसदेला सादर केला.

- मोदी सरकारच्या तिसऱ्या कालखंडातील हा दुसरा पूर्ण अर्थसंकल्प.
- निर्मला सीताारामन यांनी सादर केलेला हा आठवा अर्थसंकल्प.
- अर्थमंत्र्यांच्या 'साडीचा रंग' हा चर्चेचा मुद्दा न झालेला हा त्यांच्या अर्थसंकल्पातील कदाचित पहिला अर्थसंकल्प!
- साधारणपणे शनिवार हा आपल्या संसदेचा सुटीचा वार असण्याचा प्रघात आहे. हा अर्थसंकल्प मात्र शनिवारी सादर झाला.
- 'न कर्ता वार म्हणजे शनिवार' असे मानणारी आपली संस्कृती आहे.

  तसा हा अर्थसंकल्प खरोखरच आहे का? असा प्रश्न पडावा असा हा अर्थसंकल्प.
- कृतज्ञतेच्या नमनात थेंबभरही तेल वाया न घालवणारा असा हा अर्थसंकल्प!
- लोकसभेत अर्थमंत्र्यांच्या समोरच्या बाजूला बसलेल्या मंडळींना आयते कोलीत हातात न देणारा आणि टिका किंवा विरोध करायचं असेल तर थोडे का होईना डोके खाजवायला लावणारा अर्थसंकल्प!
- निर्मला सीतारामन यांच्या अर्थमंत्रीपदाच्या आज-पर्यंतच्या कारकिर्दीतील सगळ्यांत कमी वेळाचे अर्थसंकल्पीय भाषण असणारा अर्थसंकल्प.

खरं म्हणजे...

अशा प्रतिक्रिया या ह्या अर्थसंकल्पा बाबतच्या रिल्स वाटाव्या अशा आहेत.

हा अर्थसंकल्प त्याच्या पलीकडे जाणारा आहे.

कोणताही अर्थसंकल्प हा तसा असलाच पाहिजे.

अंमलबावणीबाबत त्याचा अस्तित्व – काल (शेल्फ – लाईफ) जरी एक वर्षापुरता मर्यादित असला तरी धोरणं, कारणं, परिणाम म्हणून त्याच्या पलीकडे जाणारा असा अर्थसंकल्प असावा अशी जी संसदीय लोकशाहीची गरज असते ती पूर्ण करणारा असा हा अर्थसंकल्प आहे.

जागतिक राजकारण, जागतिक समाजकारण, जागतिक अर्थकारण हे कोरोना नंतरच्या काळात आमूलाग्र बदलले आहे. खरं तर, अगदी स्थानिक पातळी ते राष्ट्रीय पातळी ते जागतिक पातळीवर हे अनुभवायला मिळते आहे. अशा परिस्थितीत एखाद्या व्यावसायिक संघटनेने स्वतःच्या अर्थकारणाचा, उत्पन्नाचा, खर्चाचा, व्यावसायिक विचार करावा तशा पद्धतीने हा अर्थसंकल्प मांडला गेला आहे. त्यात गैर काहीही नाही. राजकारण, समाजकारण, अर्थकारण हे एकाचवेळी सांभाळत आर्थिक धोरण मांडणारा असा हा अर्थसंकल्प आहे. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर, या अर्थसंकल्पात तपशील नाहीत असे नाही ; पण धोरणात्मक गुणवैशिष्ट्ये जास्त आहेत.

अशा धोरणात्मक पार्श्वभूमीचा विचार शब्दांकित करण्यासाठी हा लेख प्रपंच ...

याबाबतचा पहिला मुद्दा म्हणजे काही वर्षांपूर्वी आपल्या देशात वैयक्तिक आयकर विषयक नवीन कार्यप्रणाली (New Tax System) सुरू करण्यात आली. त्या पद्धतीनुसार तेंव्हापासून स्वतःची आयकर विवरण पत्रके (Income tax return) भरणाऱ्या मंडळींची संख्या वाढत आहे. त्यामुळे या अर्थसंकल्पात जुनी करप्रणाली बंद करण्याची घोषणा होईल अशी एक सर्वसाधारण अपेक्षा होती. पण या अर्थसंकल्पी भाषणात जुन्या आयकर प्रणालीचा उल्लेखच येत नाही. मात्र या जुन्या योजनेत सरकारला स्वारस्य नाही हे पुरेसे स्पष्ट होईल असे आकर्षक बदल नवीन करप्रणालीमधे या अर्थसंकल्पात करण्यात आले आहेत. त्यामुळे येणाऱ्या काही काळात याबाबत निश्चित स्वरूपाची घोषणा होऊ शकते. कदाचित ३१ मार्च २०२५ रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षासाठीच्या कालाकरता कितीजण नवीन करप्रणालीनुसार आपापली आयकर विवरण पत्रके भरतात? आणि गेल्या वर्षीच्या तुलनेत यावेळी किती वाढ होते? याचा अंदाज घेऊन याबाबतचा अंतिम निर्णय घेतला जाऊ शकतो. तोपर्यंत सुधारित आयकर विधेयक संसदेत मंजूर करून घेणे यावर सरकार स्वतःचे लक्ष केंद्रित करण्याची शक्यता आहे. तपशील आणि तत्त्व यांची गल्लत न करता कार्यवाही पण त्याचवेळी निःसंदिग्ध दिशा दर्शन असे हे समीकरण आहे.

असा विचार करत असताना जाणवणारी दुसरी गोष्ट म्हणजे, अर्थसंकल्पात उल्लेख नसला तरी अर्थसंकल्पीय चर्चा ऐन भरात असताना केंद्रीय वित्त सचिव यांनी मात्र जुनी आयकर प्रणाली सुरू ठेवणे फार काळ शक्य होणार नाही अशा आशयाचं विधान केल्याची चर्चा आहे. लोकप्रिय राजकारणाच्या पलीकडे जात विचार केला तर हे विधान यथायोग्य आहे. त्यामुळे ही योजना अधिकृतपणे बंद होईपर्यंतच्या दरम्यानच्या काळात ज्या आयकरदात्यांनी जुनी आयकर योजना स्वीकारून त्या अंतर्गत गेली कित्येक वर्षे आयकरात सवलत मिळवून देणाऱ्या गुंतवणूक योजनात गुंतवणूक केली आहे त्या गुंतवणुकीचा विचार करावा लागेल. कारण आज ना उद्या, कधी ना कधी तरी जुनी आयकर योजना बंद होणार हे उघड आहे. खरं तर, प्रमाणित वजावट (स्टँडर्ड deduction) गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात नवीन करप्रणालीतही लागू झाली आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात १२ लाख ७५ हजार रुपया पर्यंतच्या करमुक्त उत्पन्नाची तरतूद, उत्पन्नाच्या सुधारित पातळ्या आणि त्यावर आयकराचे बदललेले दर हे फक्त नवीन आयकर प्रणालीतच लागू होणार आहेत. त्यामुळे जुनी आयकर प्रणाली म्हणजे Slow, Steady but Sure Death हे धोरण तसा उल्लेख नसला तरी अधोरेखित होते आहे. तसेच, काही वर्षांपूर्वी आपल्या देशात चर्चेत असणारी Direct Tax Code नावाची गोष्ट आता एकदम 'जुने जाऊ द्या मरणालागूनी, जाळून किंवा पुरूनी टाका' सारखी करून टाकली आहे!

याबाबतची तिसरी गोष्ट म्हणजे, यंदाच्या अर्थसंकल्पीय भाषणात नवीन आयकर कायदा संसदेत मांडला जाईल असा मोघम उल्लेख आहे. बाकी त्याबाबत काहीही, कोणताही उल्लेख तिथे नाही. पण गेल्या काही वर्षांत ज्या पद्धतीने कर - प्रक्रियेचे सुलभीकरण करण्यात आले आहे किंवा येते आहे त्यामुळे सध्याच्या प्रचलित आयकर कायद्याची अनेक कलमे कालबाह्य झाली आहेत. त्यांना वगळताना येणाऱ्या काळाचा वेध घेणारा असा नवीन आयकर कायदा असेल हे उघड आहे.

या अर्थसंकल्पातील करविषयक तरतुदी बघत असताना जाणवणारी चौथी गोष्ट म्हणजे, तसा स्पष्ट उल्लेख नसला तरी या अर्थसंकल्पात एखाद्या करापासून मिळणारे उत्पन्न ( रक्कम ) याला महत्त्व देत असतानाच कर - महसूलातील सातत्य (Frequency) या निकषालाही महत्त्व देण्यात आले असावे. यातून धोरण सातत्य आणि धोरण स्थैर्य साधत असतानाच उत्पन्नाचे

सातत्यही राखले आहे. सिक्युरिटीज transaction टॅक्स सारख्या करातून सरकारला अक्षरशः दररोज उत्पन्न मिळत असते. तसाच काहीसा प्रकार दीर्घकालीन भांडवली नफ्यावर कर (लाँग टर्म कॅपिटल गेन टॅक्स) आणि अल्पकालीन भांडवली नफ्यावरील कर (शॉर्ट टर्म कॅपिटल गेन टॅक्स) याबाबतही आहे. अख्ख्या अर्थसंकल्पीय भाषणात या तिन्ही करांचा उल्लेख नसला तरी आयकरात सवलत देण्याने न येणारे उत्पन्न भरून काढताना सरकारची भिस्त या तीन करांवर असू शकते हा त्या अनुल्लेखाचा धोरणात्मक अर्थ असू शकतो.

पाचवी गोष्ट म्हणजे, या अर्थसंकल्पीय भाषणात 'संरक्षण' हा शब्द एकदाही येत नाही. पण मोदी सरकारचा तिसरा कालखंड सुरू झाल्यापासून संरक्षण विषयक वस्तू आणि सेवा यांच्या उत्पादनावर आणि निर्यातीवर देण्यात आलेला भर सर्वश्रुत आहे. त्यानुसार कामगिरीही होते आहे. त्यानुसार या अर्थसंकल्पात संरक्षण खात्यासाठी करण्यात आलेली भरीव तरतूद ही निश्चितच लक्षात घेण्याजोगी आहे. त्यातही या तरतुदीचा मुख्य भर हा संरक्षण विषयक संशोधन आणि उत्पादन याबाबत असेल व पगार आणि निवृत्तीवेतन अशासारख्या प्रशासकीय बाबींवर नसेल अशी जी चर्चा गेला काही काळ आपल्या देशात सुरू आहे ती इथे आवर्जून लक्षात घेतले पाहिजे. सध्या सुरू असलेल्या आर्थिक वर्षात संरक्षण विषयक वस्तू आणि सेवा यांची सुमारे ६५००० कोटी रुपयांची निर्यात करण्याचे ठेवण्यात आलेले उद्दिष्ट, अमेरिकी राष्ट्राध्यक्ष पदाची निवडणूक ऐन भरात असतानाही अमेरिकेने आपल्या देशाच्या संरक्षण क्षेत्रात केलेली गुंतवणूक याची त्याला पार्श्वभूमी आहे हे इथे विसरता येत नाही.

याबाबतची सहावी गोष्ट म्हणजे, या अर्थसंकल्पीय भाषणात 'तेल' हा शब्द येतं नाही. तेल, सोने, कोळसा या तीन गोष्टींची आयात ही आपल्या देशासाठी अपरिहार्य आहे. संवेदनशील किंमती ही त्यातली अडचण आहे. रशिया हा तेलाबाबतचा आपला तारणहार आहे. त्यामुळे अर्थसंकल्पात तेलाचा उल्लेख हा एका अर्थानं रशियाचा उल्लेख आहे. अर्थसंकल्प सादर होण्याच्या आधीच्या काही दिवसांत जागतिक राजकारणात झालेले बदल लक्षात घेऊन तेल तर घेणार, ते तेल रशिया कडून (M) घेणार असे कृतीने सांगू; उगाचच ते शब्दात घालून कळत - नकळत Ruffling the feathers कशासाठी असा तर विचार 'तेल' हा शब्दच अर्थसंकल्पात गाळण्यामागे असावा का ?

सातवा मुद्दा म्हणजे, असाच काहीसा प्रकार, पण वेगळ्या अर्थाने , सोन्याबाबत असावा का ? सोन्याची आयात, सोन्याचे दर यात सामाजिक भावना जास्त प्रबळ आहे. राष्ट्रीय अर्थकारणाचे त्यात नुकसान आहे हे सर्वमान्य नसले तरी सर्वज्ञात आहे. त्यामुळे सरकार किंवा / आणि रिझर्व्ह बँक यांच्याकडे असणारा सोन्याचा साठा तर वाढता ठेवायचा; पण सरकारबाह्य सोन्याची खरेदी मर्यादित ठेवायची ही दिशा स्पष्टपणे अधोरेखित करण्यासाठी अर्थसंकल्पीय भाषणात सोन्याचा उल्लेख टाळला गेला असावा ... उगाचच चर्चा नको.

कारण गेल्या काही महिन्यांत सोन्याबाबत झालेल्या घटना इथे आवर्जून लक्षात घेण्याजोग्या आहेत. कोरोनाच्या काळात जगातील अनेक देशांनी त्यांच्या देशाच्या अर्थव्यवस्थेतील अतिरिक्त गुंतवणूक योग्य रक्कम ( Liquid Investible Surplus ) सोन्यात गुंतवली होती. अलीकडे कोरोनाचा नवीन प्रकार अस्तित्वात आल्याची चर्चा अल्पकाळ का होईना रंगली नसली तरी सुरू झाली होती. त्या दिवसांत पुन्हा अनेक देशांनी त्यांची सोन्याची खरेदी वाढवली होती.

आपल्या देशापुरता विचार करायचा झाला तर, १९९०-९१ साली गहाण ठेवावे लागलेल्या सोन्यापैकी १०० मेट्रिक टन सोने जुलै - ऑगस्ट २०२४ मधे

आपण परत आणले आहे. (ही बातमी पसरताच चीनने त्याच आठवड्यात १०६ मेट्रिक टन सोन्याची खरेदी केली होती.) तसेच, सार्वभौम सुवर्णरोखे (Sovereign Gold Bonds) या प्रकाराबाबत ही धोरण आणि कृती या दोन्ही आघाड्यांवर पावले उचलली गेली. त्यातून सोने हा प्रकार शक्य तितक्या वैयक्तिक अर्थकारणातून बाजूला पाडण्याचे धोरण हा अर्थसंकल्प पुढे नेतो.

तसेही सध्याची तरुण भारतीय पिढी ही सोन्यापेक्षा हिरे आणि दागिने (Diamonds And Jewelleries) यांना जास्त पसंती देते हे सरकारी धोरणाच्या पथ्यावरच पडणारी गोष्ट आहे. आता यातले कारण कोण आणि परिणाम काय हा एका स्वतंत्र लेखाचा विषय होईल. हिरे-दागिने याबाबत यंदाच्या अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या तरतुदींना ही सविस्तर पार्श्वभूमी नक्कीच आहे.

आठवा घटक म्हणजे, एकंदरीतच गेल्या ७-८ महिन्यांत भारतीय कर्जरोखे हा विषय जागतिक आणि राष्ट्रीय गुंतवणूक क्षेत्रात चर्चेचा विषय बनला आहे. या काळात जगातील किमान ५ कर्जरोखे निर्देशांकात भारतीय सरकार व भारतीय कंपन्यांच्या निवडक कर्जरोखे व तत्सम गुंतवणूक साधनांचा समावेश करण्यात आला आहे. ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, इंडोनेशिया, जपान यासारख्या काही देशांची आपल्या देशातील कर्जरोखे बाजारातील वावर वाढला आहे. कर्जरोखे व त्यांचा मर्यादित अस्तित्वकाल हा प्रकार Liabilities या निकषावर वाढत्या अर्थव्यवस्थेला सोयीचा जातो हे तत्त्व भारतीय सरकार मोठ्या प्रमाणावर अंमलात आणत आहे. यंदाचा अर्थसंकल्प ही प्रक्रिया आणखीन पुढे नेत सर्वसामान्य भारतीय गुंतवणूकदारांची नियमित उत्पन्नाची वाढती गरज लक्षात घेऊन व्याजापासून मिळणाऱ्या उत्पन्नावरील कराबाबतच्या तरतूदी मांडतो. त्यानुसार अशा व्याजावरील TDS च्या मर्यादेत आता वाढ करण्यात आली आहे.

आर्थिक वातावरणात नेहमीच म्हटले जाते की, Any Budget teaches us the concept of Value for money.

पण हा अर्थसंकल्प केवळ त्यावर थांबत नाही; तर तो आपल्याला Time Value of Money आणि Frequency Value of Money कडे घेऊन जातो आहे.

**– चन्द्रशेखर टिळक**
सी-४०२, राज पार्क, मढवी बंगल्याजवळ,
राजाजी पथ, डोंबिवली (पूर्व), पिन - ४२१२०१
भ्रमणध्वनी - ९८२०२९२३७६

## श्री. रविंद्र रघुनाथ रसाळ २५ वर्ष सेवापूर्ती



विद्या प्रसारक मंडळाचे प्रबंधक सी.ए. श्री. रविंद्र रघुनाथ रसाळ यांची आपल्या संस्थेमध्ये सलग २५ वर्षे सेवा पूर्ण झाली आहे. त्यानिमित्त मंडळाच्या दि. २८.०१.२०२५ च्या कार्यकारिणी समितीच्या सभेदरम्यान मंडळाचे विश्वस्त व कार्याध्यक्ष डॉ. विजय वासुदेव बेडेकर यांनी श्री. रसाळ यांचा भेटवस्तू देऊन सत्कार केला. यावेळेस मंडळाचे विश्वस्त डॉ. महेश विजय बेडेकर यांनी श्री. रसाळ यांच्या कार्याचा गौरव केला. तर संस्थेचे कार्यवाह श्री. अभय वामन मराठे, सहकार्यवाह श्री. अुत्तम भास्कर जोशी, कोषाध्यक्ष श्री. त्रिविक्रम पांडुरंग बेंद्रे, ज्येष्ठ सभासद श्री. जयंत नारायण कयाळ व सभासद श्री. दिलीप गुणाकर जोशी यांनी श्री. रसाळ यांचा शुभेच्छा देऊन सन्मान केला.

# विनिता तेलंग यांची 'सूर्यकन्या सावित्री' कादंबरी

*ज्येष्ठ तत्त्वज्ञ व कवी योगी अरविंद यांनी इंग्रजीत लिहिलेल्या 'सावित्री' या महाकाव्यावर आधारित 'सूर्यकन्या सावित्री' ही विनिता तेलंग यांची कादंबरी नुकतीच प्रकाशित झाली. त्यावर प्रकाश टाकणारा लेख– संपादक*

अरविंद यांच्या महाकाव्यावर विनिताने 'सूर्यकन्या सावित्री' ही छोटी कादंबरी लिहिलीय. कथा सत्यवान सावित्रीची आहे. एका कहाणीत होणारी ही कथा असली तरी मानवी आयुष्याच्या तत्त्वज्ञानाचा विचार केला तर त्याला खूप गहन अर्थ आहे. श्री अरविंदांनी लिहिलेल्या आपल्या 'सावित्री' ह्या महाकाव्यातील चोवीस हजार काव्यपंक्तींत हिंदू तत्त्वज्ञानाचं सारं सार आणि प्रतिबिंब आहे. विनिताच्या ह्या पुस्तकातूनही हे तत्त्वज्ञान छान येऊन जात आहे.

सगळ्या गोष्टींकडे आपण एका वैश्विक रचनेतून बघतो. ह्या कथेकडेही मानवी जीवनातच ह्या आदि अशा ब्रह्मचेतनेच्या तेजापर्यंत पोहोचण्याचा, मानवी आयुष्य उत्क्रांत करण्याचा आणि स्वतः उत्क्रांत होण्याचा प्रवास ह्या दृष्टीने बघायला हवे. तोच उद्देश लेखिकेचाही आहे असं मला ह्या कादंबरीच्या जन्मापासून वाटलं. अरविंदांनी लिहिलेलं किंवा एकूणच ह्या तत्त्वाच्या संकल्पनेला शब्दबद्ध करणं हे एक अवघड काम होतं. पण ह्या कथेच्या रूपाने वाचक त्याचा 'आत्मा' नक्कीच जाणून घेऊ शकतील. मला खात्री आहे की, ह्या कथेत वेगवेगळ्या वाचकांना वेगवेगळ्या संभाव्यता सापडतील.. कदाचित वेगवेगळ्या वेळी आणि वेगवेगळ्या वयाच्या टप्प्यावरही हीच कादंबरी वेगळी समजेल.

ह्या कादंबरीच्या निमित्ताने हिंदुत्वातील जे गाभ्याचे विचार आहेत आणि जे हजारो वर्षांपासून शाश्वत आहेत आणि अजूनही राहावेत असे वाटते ते पुनर्जीवित होतील, जपले जातील आणि ज्यांना अधिक उत्सुकता असेल ते श्री. अरविंद किंवा स्वामी विवेकानंद अधिक वाचतील.

विनिता कायमच असे मूळ विचार हाताळत असते. आपले विचार असे ललित आणि कथा–कादंबरींतून येणे ही साहित्यविश्वातील पोकळी भरून काढण्याचे काम आहे. वैचारिक स्तरावर संदर्भ साहित्य, शैक्षणिक क्षेत्रात त्याचं प्रतिबिंब, ललित, कथा, कादंबरी आणि सिनेमा–नाट्य ही सर्व क्षेत्रे मूळ विचारांनी व्यापून जायला हवीत. त्यासाठीचं तिचं हे पाऊल अत्यंत स्वागतार्ह आहे. कादंबरी विकत घेऊन वाचावी आणि आवर्जून भेटही द्यायला हवी.

'बीज प्रकाशन'च्या धनश्रीने आम्हा चौघीही मैत्रिणींची पुस्तके (एकही दमडी न घेता) प्रकाशित केली. (दीपाली, रमा, मी आणि विनिता) त्याबद्दल तिचेही अभिनंदन. कारण एकूण जेव्हा अशा प्रकारचे साहित्य निर्माण व्हायला हवे ह्यावर खलबते चालू होती तेव्हा तिने लेखकांच्या पुढच्या फळीला चांगले व्यासपीठ मिळवून दिले, हे खूप कौतुकास्पद आहे. तिचा ह्या सगळ्याकडे बघण्याचा दृष्टीकोन जेवढा भावनिक आहे, म्हणजे भारतीय विचार वगैरे; तितकीच ती प्रकाशक म्हणून व्यावहारिक आहे, म्हणजे व्यवसाय नफ्यात करणे अशा अर्थाने. अशा पाऊलवाटेनेच हमरस्ते बनत असतात!

**– विभावरी बिडवे**
ज्येष्ठ लेखिका, मुंबई
पुस्तकासाठी संपर्क – ८३०८८४१२७१

•••

एखादी उत्तम लहानशी गोष्ट आपण दररोज करत राहिलो तर
त्या गोष्टीचे कालांतराने मिळणारे फळ हे महाकाय असते.

# उंटांची अद्‍भूत रम्य दुनिया
# २०२४ हे आंतरराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष

*प्रस्तुत लेखाच्या शीर्षकावरून 'उंट' या प्रजातीची माहिती वाचण्याची उत्सुकता प्रत्येकाच्या मनात निर्माण नक्कीच झाली असेल! वाचा तर... - संपादक*

**नाचणाचे उंट**

राजस्थानातील अतिशय प्रसिद्ध उंट नाचणाचे आहेत. जैसलमेलचे नाहीत.

प्रोफेसर झहुरखान मेहर, जोधपूर.
जुलै, ऑगस्ट १९९२.

अनेक घटनांनी भरलेल्या आठ महिन्यांनी ती भारतात परत येते. गॅरीचा जॉब गेलेला असतो. ते जर्मनीमध्ये तिच्या आईकडे जातात. तिला नॅशनल जॉग्रफिक सोसायटीकडून छोटीशी शिष्यवृत्ती व अनुदान मिळते. आता तिने हिंदी शिकण्यास सुरवात केलेली असते व तिच्या इतर सहाध्यायांना, ज्यांना अजिबात इंग्लिश समजत नाही त्यांना, ती पत्र पाठवायला सुरवात करते. त्यांची तिला रायकांना औषधे देण्यासाठी पत्रव्यवहार करण्यात मदत होते. ती भोपालाराम व डॉ. देवारामला अनेक पत्रे पाठवते.

मुख्य अडचण अशी होती की, रायकांना हवे असलेले औषध भारतात व इतर कुठेही मिळत नव्हते. या वेळेस तिला भोपालारामकडून समजते की, एक भारतीय कंपनी ते औषध बनवू लागली आहे. त्या कंपनीने तिला १००० वायल्स ७९ रु. प्रमाणे द्यायची तयारी दाखवली. तिला फ्रेंच किंवा इंग्लिश चॅरीटी मिळत नसल्यामुळे ती तिच्या जर्मन मित्रांना आवाहन करते व काही शेकडो व्हायल्स मिळविण्याऐवढे पैसे जमा करते. भोपालाराम तिला कळवतो की, राजस्थानात एकूण साठ हजार उंट आहेत व दरवर्षी औषध न मिळाल्यामुळे चार ते पाच हजार उंट मरतात व ही इंजेक्शन्स् पावसाळ्यापूर्वीच द्यावी लागतात.

त्यांनी पाली जिल्ह्यातील रायका समाजावर लक्ष केंद्रित केलेले असते. जी पाहणी करण्यात आली होती त्यानुसार उंट टीबूरसा( trypanosomiasis ) या आजाराने संसर्ग झालेले असतात. काहींच्या कळपात शंभर टक्के माद्यांचा गर्भपात झालेला असतो. गर्भपात अनेक कारणांनी असू शकतो. त्यांची चरण्याची कुरणे कमी झाली होती, अन्नाची सकसता, पौष्टीकता कमी होती. कारण त्यांच्या आरवलीतील जंगलातील कुरणे ही वन्यजीव अभयारण्यांत बदलली होती.

पण औषधे वाटणे हे काही तिचे भारतात परत यायचे कारण ठरले नसते. मुख्य कारण संशोधन हे होते व या वेळी सिंधी मुस्लीम व त्यांचे त्यांच्या उंटांशी संबंध व त्यांची रायकांशी तुलना करायची होती व हे लोक जगातील इतर मुस्लीम लोकांसारखे उंटाचे मांस खातात का हे बघायचे होते.

इल्स १३ जुलै १९९२ मध्ये भारतात परत येते. पावसाने जोर पकडला होता. पहिल्यांदा ती जयपूरला थांबून औषधाचा पहिला स्टॉक घेते. रस्त्याची अवस्था अतिशय वाईट असते. रस्त्यावर पाच इंच पाणी साचलेले असते व टॅक्सी एका खड्ड्यातून दुसऱ्या खड्ड्यांत हेलकावत, डुगडुगत जाते. ती तेथील प्रवासी बंगल्यांत उतरते. दुसऱ्या दिवशी तिला ३८४ डोस मिळतात. हणमंत तिला जोधपूरहून न्यायला येतो. तो थोडा मलूल असतो. गेल्या तीन महिन्यांत त्याला धंदा नसतो.

संध्याकाळी ते जोधपूरला जायला निघतात. ती अँबेसीडरमध्ये पाठीमागच्या सीटवर झोपून राहते. मधून मधून टॅक्सी टी. स्टॉलवर थांबते. सकाळी तीन वाजता ते जोधपूरला पोहचतात. नंतर ती साद्रीला जायला निघते. तिच्या पहिल्या मुक्कामात अरवलीचे डोंगर अतिशय उजाड दिसलेले असतात. पर्णहीन वृक्ष कोरड्या उतारावर घट्ट पकडून उभे होते. पावसाने सर्व परिसर बदलून टाकला होता. सगळीकडे हिरवाई पसरली होती. वनस्पती नव्याने बहरून येत होत्या. नवीन बिया रुजत होत्या.

ती शिल्पी प्रवासी बंगल्यांत उतरते. सर्व बाजूंनी पोपटांचा आवाज, लांडोरांना आकर्षित करणारे मोर आणि माकडांचे थवे. तिला वाटते गोरीलावर संशोधन करायला हा परिसर जास्त योग्य आहे. सर्व परिसर छत्र्यांनी भरला होता.

तिची मीरा तेथे प्रसिद्ध उंट होती. ती सगळ्यांना माहीत होते. पण ती गरोदर राहत नाही. तिचा पहिल्या काही महिन्यांतच गर्भपात होतो. अडोजीच्या उंटांचा कळप परशुराम मंदिरांच्या खाली चरत असतो. तिला बघायला सर्वजण जातात. तिचे कुबड नीट दिसत नव्हते. डॉ. देवाराम तिला औषधे देतो. नंतरचे तीन दिवस अंजी–की–धानी, लटाडा व इतर गावांत औषधाच्या कुप्या कळपाच्या संख्येप्रमाणे वाटल्या जातात. त्याची ते तीन ठिकाणी नोंद करतात व कळपाच्या मालकाच्या अंगठ्याचेही ठसे घेतात. लोकांची त्यांच्याकडे बघायची दृष्टी बदलते. त्यांच्याकडे कृतज्ञतापूर्वक बघितले जाते.

शिवलाजी रायका फोटोग्राफर, त्या दोघांना रायकाचे कपडे घालून फोटोग्राफी करतो. ती नऊवार घागरा, कांची (ब्लाऊज), सगळे दागिने, पूर्ण दंड प्लास्टीकच्या बांगड्यांनी भरून हातांतही बांगड्या व ब्रेसलेट घालून फोटो काढते.

जोधपूरला परत जाताना डॉ. देवरामला पाचुंदाला त्याच्या घरी सोडतात. त्याची पुतणी तिच्या हातावर मेंदी काढते. पाचुंदा पासून जोधपूरचा रस्ता दोन तासांवर असतो. पूर्णवेळ ती व हणमंत हिंदीत बोलतात. ती तिच्या तोडक्या मोडक्या हिंदीत बोलते. तो आपल्या कौटुंबिक समस्या सांगतो.

आता तिला सिंधी मुस्लीमांच्या संशोधनावर लक्ष केंद्रित करायचे असते. फक्त तीन आठवडे उरलेले असतात. तिला प्रोफेसर मुसांनी सांगितले असते की, ते जास्ती करून जैसरमेलच्या परिसरांत असतात. तिला अनेक प्रयत्न करूनही दुभाषा मिळत नाही. गरज पडली तर हणमंत हिंदीत सांगू शकेल असे तिला वाटते. जोधपूरहून निघताना बँकेत गेल्यावर तिथला मॅनेजर तिला सांगतो की, 'नाचणाचे उंट प्रसिद्ध आहेत. तुम्ही ते पहा. नाचणाच्या ठाकुरकडचा तोला (कळप) प्रसिद्ध होता. तो माझा मित्र होता. त्याला माझी आठवण सांगा.'

तिला आठवते की, प्रोफेसर मेहरनीही तिला नाचणाच्या उंटां विषयी सांगितलेले असते व सर्व उंटांचे गाडीवान (Caravaners) नाचणाच्या उंटाच्या नावाने शपथ घेत असत.

जोधपूरहून ते बाहेर पडतात. तोपर्यंत दुपार झाली होती. हवा अत्यंत उष्ण असते तरी, जैसलमेरपर्यंतचे वाळवंट जवळजवळ हिरवेगार होते. ती मूमल टुरिस्ट बंगल्यात राहते, कारण तिच्या जोधपूरच्या एका संपर्काने तिला मॅनेजरला द्यायला चिठ्ठी दिली होती. त्याला तिच्या महत्त्वपूर्ण कामाची माहीती दिली होती.

तिला नाचणाला कसे जायचे हे शोधायला भरपूर वेळ असतो. तिला माहीत असते की, जैसलमेरच्या आजूबाजूच्या प्रदेशा प्रमाणे नाचणा प्रतिबंधित क्षेत्रात असते व त्यासाठी परमिट लागते.

म्हणून ते परवानगी घेण्यासाठी तिथल्या ऑफीसमध्ये जातात. तिला परवानगी मिळत नाही व

तेथील ऑफीसर तिला सांगतो की, अशी परमिशन गेल्या पाच वर्षांत कोणालाही दिलेली नाही व तेथे गोळीबार चालतो, त्यात त्यांचा मृत्यू होऊ शकतो.

हणमंत तिला जिल्हाधिकाऱ्याला भेटायला सांगतो. ती जिल्हा अधिकाऱ्याला भेटते, तो तिला अगदी सहज परमिशन देतो व सांगतो की, तेथील गोळीबाराबद्दल तिने काळजी करायची गरज नाही.

पण आता हणमंतला त्याची गाडी घेऊन त्या रस्त्याने जायची काळजी वाटते. कारण रोजच परिस्थिती बदलत असते त्या रस्त्यावर खूप वाळूचे ढिगारे हालत असतात. त्यामुळे एखाद्या दिवशी रस्ता मोकळा असतो तर दुसऱ्या दिवशी वाळूच्या ढिगाऱ्यांनी बंद राहतो.

दुसऱ्या दिवशी सकाळी ते सहा वाजता आधी रबारी-की-धानीला जीपने जातात. त्यांना तिथे पोहोचायला २५ मिनीटे लागतात. ती पंधरा घरांची रायकांची एक छोटीशी वस्ती थोड्याशा उतारावर वाळूच्या वाळवंटात असते. ते लोक अतिशय मैत्रीपूर्ण असतात. या अशा निर्जन जागी सात पिढ्यांपासून राहत असतात. त्यांचे पूर्वज जोधपूरहून येथे जैसलमेरच्या महाराजांच्या सांगण्यावरून आलेले असतात. त्यांना त्यांच्या उंटांची काळजी घेण्यासाठी चांगल्या लोकांची आवश्यकता असते पूर्वी तेथे एक डझन रायका वसाहती होत्या.

जैसलमेरमध्ये त्यांनी हणमंतशी पुन्हा संपर्क साधला आणि मोठ्या साहसासाठी त्याच्या गाडीत बसले त्यांना परत जोधपूरच्या वाटेवर यावे लागले. जबाबदार व्यक्ती, म्हणून मनू, हणमंत बरोबर बसला. ते पहिल्या चेकपोस्टशी आल्यावर तिली सही करावी लागते. पश्चिम सीमेवर सर्वकाही शांत असते. तिथे गोळीबार किंवा टॅक्स् नसतात. चिंतेचे कारण म्हणजे डांबरी रस्त्यावरील वाळूचे ढिगारे व त्यांची खोली वाढत असते. एक मोठा वाळूचा ढिगारा त्यांचा रस्ता अडवतो. हणमंत काळजीत पडतो गाडी पुढे नेण्याचा प्रयत्न करतो पण त्याची गाडी वाळूच फसते. बऱ्याच वेळाने एक जीप त्या रस्त्याने जाते. हणमंत इल्स व मनुला पुढे जाण्यासाठी आग्रह करतो शेवटी ते दोघे दुसऱ्या जीपने पुढे जातात. ते हणमंतला पाणी व सिगरेटस आणून देतात व परत नाचणाला जातात.

नाचणा हे काहीसे निराशाजनक मोडकळीस आलेले ठिकाण होते. ते दुसऱ्यांदा तेथे पोहोचतात तेव्हा तेथे खूप जोराचा पाऊस पडत असतो. ते राजपुरोहीत खाणावळीत थांबतात.

तेथे समुदायात बसून आकाश रिकामे होताना बघतांना, पूर्णपणे अनोळखी लोकांमध्येही ऐक्याची भावना निर्माण होते व संवाद चालू होतो. मनू तिला त्या चहाच्या शेजाऱ्यांना काय म्हणायचे होते ते सारांश रुपाने सांगतो.

नाचणा मधले दैनंदिन जीवन, इंदिरगांधी कालवा, एक मोठा जलसिंचन प्रकल्प जो पंजाबातून वाळवंटात पाणी आणणार असतो. तो आल्यापासून जीवन त्रासदायक झालेले असते. लोक दहा वर्षांपूर्वी कालवा येण्यापूर्वी आनंदी असतात. मग पंजाबी येतात व सर्व जमीन खरेदी करतात. वास्तविक जमिनीचे वाटप स्थानिक लोकांनाही ठरलेले असते. पण बाहेरून श्रीमंत लोक येतात व अधिकाऱ्यांना लाच देतात. 'उंटा विषयी काय? अजून ते येथे महत्त्वाचे होते का?' असा प्रश्न विचारल्यावर उत्तर मिळते की, त्यांचे महत्त्व खूप कमी झाले होते. नाचणाचे ठाकूर रायका व सिंधी मुस्लिमांना अन्न व रोजगार देत असत पण त्यांनी सर्व उंट जैसलमेरच्या महाराजांना विकले व सर्व यंत्रणा कोलमडली. आता चराऊ जमीनही नाही व कुरणे कालव्यामुळे नांगरली जाऊ लागली व जवळजवळ त्यांचे सर्व प्राणी मेले.

जेव्हा पावसाचा जोर कमी झाला तेव्हा ते नाचणा किल्ल्याकडे निघाले. जेथे महाजन, ज्याला नाचणाच्या

ठाकूरने पत्र लिहीले होते तो पांढरा फेटा घातलेला एक म्हातारा होता. त्याने पत्र उघडले आणि ते मोठ्याने वाचले. त्याला उंटांबद्दल फारसे काही आठवत नव्हते. नक्कीच, ते तेथे होते. परंतु आता फारच कमी होते. ठाकूर साहेबांकडे काही असतील व रायकां त्याच्याकडे लक्ष देत असतील.

'चहा आवडेल का?' त्याने विचारले व पाईप फुकण्यास सुरूवात केली. ते नम्रपणे चहाची वाट पाहत असतानाच, मुसळधार पाऊस पुन्हा सुरू झाला आणि आणखी जोरदार पाऊस पडला. महाजन साहेब, लांब पसरून झोपी गेले व घोरू लागले आणि चहा झाला तरी भानावर आले नाहीत. ते चहा पिऊन निघाले. यावेळी जमीन अनेक इंच पाण्याने भरली होती.

नाचणाला येऊन त्यांनी काही साध्य केले होते का?

नाचणाचे पौराणिक महत्त्व नाहीसे झाले होते. उंटांची कीर्तीही भूतकाळांत होती. पण तरी ते तेथे पोचू शकले व त्यांचा वेळ आनंदात गेला.

सर्व अडथळयांवर मात करून तेथपर्यंत पोहोचल्याबद्दल समाधानाची थोडीशी भावना होती. संध्याकाळी भारताच्या अणुचाचणी ठिकाण असलेल्या पोखरणमध्ये विश्रांती बंगल्यात त्यांनी रात्र काढली - ती इमारतीच्या समोरच्या छोट्या लॉनमध्ये केनच्या तुटलेल्या खुर्चीवर बसून रात्रीच्या जेवणाची वाट बघत होती तेव्हा तिला नैराश्याने घेरले. संपूर्ण जैसलमेर प्रकरण निरुपयोगी होते. केवळ पटकन जाऊन काही संशोधन करणे शक्य नाही हा एक चांगला मुद्दा होता, कारण प्रथम संबंध आणि सामाजिक भांडवल तयार करण्यासाठी महत्त्वपूर्ण वेळ खर्च करावा लागला. आता काही दिवस उरले होते आणि संशोधनातून समाजाला सांगू शकेल असा कोणताही महत्त्वाचा निष्कर्ष तिने काढला नव्हता. तिचे संशोधन व तिच्या कुटुंबाचे भविष्य काय आहे याची तिला कल्पना नव्हती. जर्मनीला परत जाणे आणि नंतर नोकरी शोधणे आणि घरच्यांना आधार देणे यासाठी सर्व शक्ती खर्च करावी लागेल. असे वाटत होते की, ती नजीकच्या भविष्यात, कधीही भारतात परत येऊ शकणार नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा ते प्रवासाला निघतात तेव्हा हणमंत तिला चरणला भेटायला सांगतो. हणमंतला वाटते की, तो तिला मदत करेल.

चरण हे गोष्टी सांगणारे, सर्व कौटुंबिक नोंदी ठेवणारे व इतिहास सांगणाऱ्यांची जात होती. त्यांचा राजस्थानच्या राजघराण्याचा व राजपुत कुटुंबाचाही इतिहास त्यांना तोंडपाठ असे व तो एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे तोंडी जात असे. आतासुद्धा प्रत्येक राजपूत व सिंधी मुस्लीम कुटुंबाचा वंशपरंपरागत चरण होता, ज्याने सर्व कौटुंबिक नोंदी केल्या होत्या.

हणमंत तिला ज्या चरणला भेटायला सांगत होता तो सिंधी मुस्लिमांसाठी काम करत होता.

हणमंतने त्याच्याबद्दल ऐकले होते आणि सिंधी मुस्लिमांचा इतिहास, उंटाशी त्यांचा संबंध आणि हा प्राणी राजस्थानमध्ये कसा आला याबद्दल तो आपल्याला काहीतरी सांगेल अशी अपेक्षा होती. त्याचे नाव तेजदान चरण होते आणि तो फलोदी जवळील एका छोट्या गावात राहत होता. त्यांना चरणचे एका खोलीचे घर सापडते. पण तो घरात नसतो.

दिल्लीला जाण्यापूर्वी तिचा शेवटचा मुक्काम जोधपूरला होता. डॉ. देवाराम तिला प्रवासी बंगल्यात भेटायला येतो. तो तिच्याकडून परत येण्याचे आश्वासन घेतो. डॉ. देवाराम तिला जोधपूरच्या प्राणीशास्त्रज्ञ प्रोफेसरला भेटू या म्हणतो. त्यांना रायका व उंटात खूप स्वारस्य असते व वाळवंटातील पर्यावरणशास्त्रा विषयीही आकर्षण असते.

प्रोफेसर घरी होते. ते त्यांच्या मोठ्या व हवेशीर बैठकीच्या खोलीत त्यांचे स्वागत करतात. ती त्यांना तिच्या सर्व प्रयत्न व कष्टांविषयी व तिच्या रायकांबरोबर असलेल्या संबंधी विषयी सांगते.

ते तिच्या कामाचे व निष्ठेचे कौतुक करतात. ते तिला जर्मनीत असलेल्या स्कॅालरशीप विषयी सांगतात. व त्यासाठी अर्ज करायला सांगतात व संपर्क ठेवायला सांगतात. ते परत परतीच्या रस्त्याला लागतात. डाव्या हाताला वळणावर एक सूचना फलक पाहून हणमंत गाडीला ब्रेक लावतो. जैतारन, इथेच चरण काही कामासाठी गेला होताना?

तिने हो, नाही म्हणायच्या आधीच त्याने गाडी मुख्य रस्त्यांवरून फिरवली. तो पुढच्या चहाच्या स्टॅालवर थांबला व त्याने विचारले.

'सिंधी मुस्लीम कुठे राहतात?' 'पुढच्या गांवात, पाच कि.मी. त्यांची बरीच घरे आहेत.' उत्तर मिळाले. नंतर चरणच्या मागावर पुढे पुढे चौकशी करत जाताना, त्यांना रस्त्यावर एकट्याच चालणाऱ्या माणसाची लांबून छायाकृती दिसली. त्याने रंगीत फेटा घातला होता व त्याच्या हातात एक पिशवी होती. हणमंत पुटपुटला, हाच तो असावा. 'राम, राम, तुझे नाव काय? तू संकाली गावातला आहेस का? मग तू नक्कीच, तेजदान चरण असशील. आम्ही तुला अनेक आठवडे संपूर्ण राजस्थान भर शोधत आहोत. चल गाडीत बस, आपण चहा पिऊ या.' तेजधनने पापण्या मिचकावल्या नाहीत, किंवा आश्चर्य व्यक्त केले नाही. स्वतःची मनःशांती न ढळू देता तो गाडीत पुढे बसला. हणमंतने त्याला मॅडमचे उद्दीष्ट सांगितले. त्याच्या म्हणण्याप्रमाणे राजस्थानला उंट खालीलप्रमाणे आले.

सायरा बाघानी लंकीया गावात राहत होता. ते उमेरकोट पासून १२ किमी आहे. (आता पाकिस्तानात आहे.) पाबुजीच्या चरणने त्याला सैयद बघानीच्या उंटाविषयी सांगितले. पाहुजीला उंट त्याच्या पुतणीच्या लग्नात द्यायचे होते. पाबुजीने सैयद बघानीचे उंट पकडायचा प्रयत्न केला. दोघांमध्ये घनघोर लढाई झाली. कोणीही माघार घेत नव्हते. पाबुजीच्या चरणने त्यांचे फेट्यांची आदलाबदल केली. म्हणजे ते एकमेकांचे भाऊ झाले. म्हणून सैयद बघानीला त्याचे उंट पाबुजीली द्यायचे होते. पण पाबुजीकडे त्याला द्यायला काही नव्हते. म्हणून तो नाही म्हणाला. सय्यद बघानीने त्याच्याकडे चरण मागितला. पाबुजी तयार झाला. त्यामुळे चरण हा दोन्ही समाजात आदरणीय आहे. हीच गोष्ट प्रो. मेहरनीही तिला सांगितलेली असते. हे कधी घडले असे विचारताच चरण लगेच उत्तर देतो हे विक्रम सौवंतसर म्हणजेच १२६६AD मध्ये घडले. चरणच्या मते यापूर्वी राजस्थानात उंट नव्हते व ते पाकिस्तानांत ७११AD मध्ये आले. तेजदानकडे प्रत्येक प्रश्नाला उत्तर असते. त्याच्या जवळील माहितीचा खूप उपयोग झाला असता. तो आधी न भेटल्यामुळे त्तिली खूप वाईट वाटले. पण या मनोरंजक भेटीतून बाहेर पडतात.

आता त्यांना दिल्लीला निघायला खूपच उशीर झालेला असतो व दिल्लीचा रस्ताही खूप खाचखळग्यांचा असतो. वास्तविक तेजदनच्या भेटीने त्यांना आनंद व्हायला हवा होता पण तसे झाले नाही. पुढच्या बारा तासांच्या प्रवासात ते गप्प असतात. त्यांचे सर्व लक्ष दिल्लीतील जीवघेणा ट्रॅफीक पार करण्यावर लागले होते. इल्स त्याला तिच्या गेस्टहाऊसचा रस्ता सांगते. ते त्यांना अपेक्षेपेक्षा लवकरच सापडते. ती हणमंतला शेवटचा चहा देते. दिल्लीच्या ट्रॅफीकने तो गोंधळलेला असतो. तो पटकन चहा पितो व बाहेर पडतो.

**– सौ. अल्पना बापट**
डॉ. बापट हॉस्पीटल, ठाणे
भ्रमणध्वनी – ९८३३०२९३५६

# ओळख नवीन कायद्याची

*भारत सरकारने पालक आणि ज्येष्ठ नागरिकांची देखभाल व कल्याण अधिनियम, २००७ लागू केला. या कायद्याची उद्दिष्टे, कार्यक्षेत्र आणि लागू होण्याची व्याप्ती, महत्त्वाच्या तरतुदी, कायद्याचा प्रभाव आणि आव्हाने इत्यादींची माहिती देणारा लेख. – संपादक*

**पालक आणि ज्येष्ठ नागरिकांचे देखभाल व कल्याण अधिनियम, २००७**

वृद्धत्व हा जीवनाचा अपरिहार्य टप्पा आहे आणि वाढत्या वयानुसार आर्थिक स्थैर्य व सामाजिक आधार नसलेल्या व्यक्तींना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. भारतात, संयुक्त कुटुंब पद्धती एकेकाळी समाजाचा कणा होती. परंतु शहरीकरण, स्थलांतर आणि बदलते कौटुंबिक स्वरूप यामुळे वृद्धांची उपेक्षा व परित्यागाच्या घटना वाढल्या आहेत. या समस्येची जाणीव ठेवून भारत सरकारने पालक आणि ज्येष्ठ नागरिकांची देखभाल व कल्याण अधिनियम, २००७ लागू केला. या कायद्याचा उद्देश वृद्ध नागरिकांचे हक्क आणि प्रतिष्ठा सुरक्षित करणे असून, आर्थिक सुरक्षितता, आरोग्यसेवा, निवास आणि एकूणच कल्याण सुनिश्चित करणे हा या कायद्याचा मुख्य हेतू आहे.

**या कायद्याची उद्दिष्टे**

पालक आणि ज्येष्ठ नागरिकांची देखभाल व कल्याण अधिनियम, २००७ याचे मुख्य उद्देश खालीलप्रमाणे आहेत :-

- ✻ मुलांनी आणि नातेवाईकांनी वृद्ध कुटुंबीयांना आर्थिक व भावनिक आधार देणे ही त्यांची कायदेशीर जबाबदारी निश्चित करणे.
- ✻ ज्येष्ठ नागरिकांची उपेक्षा किंवा परित्याग होऊ नये यासाठी उपाययोजना करणे.
- ✻ वृद्ध व्यक्तींसाठी देखभाल यंत्रणा निर्माण करणे.
- ✻ वृद्ध व्यक्तींच्या आरोग्य सुविधांचा आणि कायदेशीर संरक्षणाचा विस्तार करणे.
- ✻ योग्य सोयीसुविधांनी युक्त वृद्धाश्रम उभारणे.
- ✻ वृद्ध व्यक्तींना देखभाल व निर्वाहासाठी वेगवान आणि प्रभावी कायदेशीर प्रक्रिया प्रदान करणे.

**कायद्याचा कार्यक्षेत्र आणि लागू होण्याची व्याप्ती**

हा कायदा भारतभर लागू होतो. तथापि, जम्मू आणि काश्मीर मध्ये (२०१९ पूर्वी) हा कायदा लागू नव्हता. हा कायदा खालील गटांवर लागू होतो :-

- ✻ पालक आणि ज्येष्ठ नागरिक : येथे पालक म्हणजे जैविक, दत्तक किंवा सावत्र पालक समजले जातात आणि ज्या ज्येष्ठ नागरिकांकडे स्वतःच्या उत्पन्नातून स्वतःची काळजी घेण्याचे कोणतेही साधन नाही.
- ✻ मुलं आणि नातवंडं : जैविक, दत्तक किंवा सावत्र मुलं, तसेच कायदेशीर वारसदार, जे ज्येष्ठ नागरिकांच्या देखभालीसाठी जबाबदार असतात.
- नातेवाईक : ज्येष्ठ नागरिकांच्या संपत्तीवर अधिकार असलेले नातेवाईक, जे त्यांच्या देखभालीची जबाबदारी स्वीकारू शकतात.

**कायद्याच्या महत्त्वाच्या तरतुदी**

१. निर्वाहाचा हक्क

- ज्येष्ठ नागरिकांना आर्थिक दुर्बलतेच्या परिस्थितीत मुलांकडून किंवा नातेवाईकांकडून निर्वाह मिळवण्याचा हक्क आहे.
- निर्वाहामध्ये यांचा समावेश होतो:
  - अन्न, वस्त्र, निवास, वैद्यकीय सेवा आणि इतर जीवनावश्यक गरजा.

- मासिक निर्वाह भत्ता, जो न्यायाधिकरण ठरवू शकते.

- जर मुले किंवा नातेवाईकांनी आधार देण्यास नकार दिला, तर ज्येष्ठ नागरिक न्यायाधिकरणाकडे तक्रार दाखल करू शकतात.

२. निर्वाह न्यायाधिकरणांची स्थापना

- प्रत्येक जिल्ह्यात निर्वाह न्यायाधिकरण स्थापन करणे बंधनकारक आहे.
- न्यायाधिकरणाला मुलांना किंवा नातेवाईकांना १०,००० पर्यंत मासिक निर्वाह भत्ता देण्याचा आदेश देता येतो.
- ९० दिवसांच्या आत निर्णय दिला जाणे आवश्यक आहे.
- आदेश न पाळल्यास दंड आणि तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते.

३. वृद्ध व्यक्तींच्या उपेक्षा व परित्यागासाठी शिक्षा

- वृद्ध पालकांचा परित्याग केल्यास ३ महिन्यांपर्यंत तुरुंगवास आणि ५,००० दंड होऊ शकतो.
- न्यायाधिकरणाने आदेश दिल्यानंतरही देखभाल न केल्यास कठोर कायदेशीर कारवाई केली जाते.

४. ज्येष्ठ नागरिकांसाठी वैद्यकीय सेवा आणि संरक्षण

- सरकारी रुग्णालयांमध्ये मोफत वैद्यकीय सुविधा आणि विशेष उपचार केंद्र उपलब्ध करून देणे.
- प्रत्येक जिल्ह्यात वृद्धाश्रम उभारण्याचे प्रावधान.
- मोबाईल मेडिकल युनिट्स स्थापन करून ग्रामीण भागातील वृद्धांसाठी आरोग्यसेवा प्रदान करणे.

५. मालमत्तेचे संरक्षण

- वृद्ध व्यक्तीने जर कोणत्या नातेवाईकास किंवा मुलाला संपत्ती दिली असेल आणि नंतर त्याची उपेक्षा झाली, तर संपत्तीच्या हस्तांतरणाला अवैध ठरवण्याचा अधिकार न्यायालयाला आहे.
- वृद्ध व्यक्तींना बळजबरीने घराबाहेर काढण्याविरुद्ध संरक्षण प्रदान केले जाते.
- फसवणूक, दबाव, आणि जबरदस्तीच्या मालमत्ता हस्तांतरणास प्रतिबंध.

६. मध्यस्थी अधिकाऱ्यांची भूमिका

- वृद्ध व्यक्ती आणि त्यांच्या मुलांमध्ये वाद न वाढावा म्हणून न्यायालयात जाण्याआधी मध्यस्थी अधिकाऱ्यांमार्फत तडजोडीचा प्रयत्न केला जातो.

**कायद्याचा प्रभाव आणि आव्हाने**

यशस्वी बाबी

- अनेक वृद्ध व्यक्तींनी यशस्वीरीत्या निर्वाह भत्ता मिळवला, ज्यामुळे त्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले.
- वृद्धाश्रम उभारणीस वेग आला, त्यामुळे अनाथ वृद्धांना आश्रय आणि आरोग्य सेवा मिळू लागल्या.
- ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांबद्दल जागरूकता वाढली, त्यामुळे समाजाचा दृष्टिकोन सुधारला.

अंमलबजावणीतील अडचणी

- जाणीव अभाव : ग्रामीण भागातील अनेक वृद्धांना त्यांच्या हक्कांबद्दल माहिती नाही.
- भावनिक अडथळे : वृद्ध लोकांना त्यांच्या मुलांविरुद्ध तक्रार करण्यास संकोच वाटतो.
- कायदेशीर प्रक्रियेत विलंब : न्यायालयीन प्रक्रियेमध्ये विलंब होतो, जरी कायद्यात ९० दिवसांची मुदत दिली असली तरीही.
- अपुरी पायाभूत सुविधा: भारतात अद्याप पुरेशा वृद्धाश्रम आणि वैद्यकीय सेवा उपलब्ध नाहीत.

(पृष्ठ क्र. १८ वर)

# तिळगुळ घ्या तरी कसं म्हणायचं?
## (भाग १)

*एका मराठी माणसाने उत्तरेत जाऊन तेथील लोकांशी पानिपत बद्दल हितगूज केले त्यावर हा मकर संक्रांतीच्या निमित्त लेख - संपादक*

।। सुरजमल जाट आया भाऊके दरबार ।।

.... बहीण सोनेपतला तीस वर्षे राहिली असल्यामुळे तिच्याकडे अनेक वेळा जाणे झाले व त्याच मुक्कामांमधे पानिपत व आजुबाजूची गावेही बघता आली. एक दिवस मेव्हण्याबरोबर असेच सोनेपतमधे बाजारात फिरत असताना मागून हाका ऐकू आल्या,

''गोडबोले साब ! गोडबोले साब !''

मेव्हण्याने मागे वळून पाहिले तर तो त्यांच्या बालग्रामसाठी जेथून पुस्तके विकत घेत होता त्या दुकानाचा मालक आम्हाला बोलावित होता...

''हां ! कहो गुप्तजी क्या हाल है ?'' मेव्हणा.

''अरे साब आपको एक चीज दिखानी थी.''

''हा दिखाओ ! क्या चिज है ?''

''एक किताब है जी। मेरे खयालसे मराठी मे है। देखिये तो जरा'' ।

असे म्हणून त्याने एक जीर्ण झालेले पुस्तक गोडबोलेंच्या हातात ठेवले. माझे इतिहासप्रेम त्याला माहीत असल्यामुळे त्याने ते लगेचच माझ्या हातात दिले. पहिल्या पानांच्या फाटून चिंध्या झाल्या होत्या. बघू नंतर म्हणून मी गुप्ताजींना पैसे देण्यासाठी खिशात हात घातला.

''कितने देनेके है इसके ?''

''अरे साब इसका क्या लेना ? आप मराठा है इसलिये आपके लिये बाजू रखा था ! आप इसे ले जाईये और पढके हमे भी बताईये इसमे क्या लिखा है'' गुप्ताजी हसत हसत म्हणाले. कधी एकदा घरी जातोय आणि ते चाळतोय असे झाले होते मला. सोनेपतपासून आमचे घर होते पाच/सात किमी. दिल्लीपासून वीस मैल.

तर त्या पुस्तकाची ही हकीकत......

कुलाबा जिल्ह्यातील पालीचे श्री जोशी कामानिमीत्त बरेच वर्षे उत्तरेकडे राहिले होते. बहुदा ते ब्रिटिशांच्या सेवेत असावेत. १९३० च्या आसपास त्यांनी हे पुस्तक लिहिले. ग्वाल्हेरच्या एका काळे नावाच्या गृहस्थाने पानिपत येथे जाऊन प्रत्यक्ष पहाणी करून एक लेखमालिका लिहिली होती त्यावरून श्री. जोशी यांना कल्पना सुचली की, आपणही प्रत्यक्ष युद्धभूमीच्या आसपासची गावे पालथी घालून तेथील जनतेचे मनोगत जाणून, त्यांना माहीत असलेल्या कथा/दंतकथा लिहून मराठी माणसांपर्यंत पोहोचत्या काराव्यात. हा इतिहास नव्हे, पण एक गोष्ट मात्र खरी की श्री. जोशी यांनी जर पायी हिंडून ही माहीती गोळा केली नसती तर काळाच्या ओघात हे सगळे नष्ट झाले असते. पुस्तकाचे नाव कळत नाही ना ते कोणी छापले ते कळते.

श्री. जोशी यंनी प्रथम दिल्ली ते कुरुक्षेत्र या प्रदेशाचे भौगोलिक महत्त्व व त्या भूमीत झालेल्या अनेक युद्धांचा आढावा घेतला आही. त्यात अर्थातच पानिपतच्या तीन युद्धांबद्दल माहिती आली आहे. याच भूमीतून एक

हमरस्ता जातो तो थेट पेशावरला. त्याला येथील जनता ''सडक-आझम'' म्हणायचे. म्हणजे आजचा ग्रँडट्रंक रोड. याला काही लोक 'थंडी सडक'ही म्हणत होते हे मला या पुस्तकावरूनच कळले. या रस्त्याच्या कडेला प्रत्येक मैलावर एक उंच मिनार, प्रत्येक दोन मैलांवर एक विहीर व प्रत्येक सहा मैलांवर सराई बांधलेली होती. यातील अनेक मिनार श्री. जोशी यांनी स्वत:च्या डोळ्यांनी पाहिले होते. त्यांनी या रस्त्याला समांतर चालणाऱ्या रेल्वेचाही उल्लेख केला आहे.

सोनेपत शहरात मराठ्यांनी शंभूदयाल तलावाभोवती अनेक घाट बांधले असे जोशी लिहितात तसेच पानिपत येथे असलेले प्रसिद्ध राममंदिरही मराठ्यांनी बांधले अशी माहिती पुरवतात. या मंदिरास स्थानिक लोक महाठोंका मंदिर असेच म्हणतात. जोशी म्हणतात, ''या मंदिराची आता बरीच पडझड झाली आहे. तेथे एक ब्राह्मण व्यवस्था पाहतो. त्याच्याकडे मराठ्यांनी दिलेल्या कित्येक सनदा आहेत. त्यांचे नाव होते पंडित अनुपराम. देवलांची सर्कस येथे आली असताना त्यांनी या देवळाच्या दुरुस्तीसाठी काही रक्कम या पंडिताला दिली होती पण दुरुस्ती काही झाली नसावी. पानिपतमधील देवी तलावही मराठ्यांनीच बांधला असे म्हणतात. मराठे त्यांच्या घोड्यांना पाणी पाजण्यास येथे आणीत असत.''

जोशी म्हणतात, ''अलीकडे पानिपत संबंधाचे पुष्कळसे वाङ्मय प्रसिद्ध झाले आहे व होत आहे. परंतु पानिपतच्या आसपासच्या गावांचे पूर्ण निरीक्षण करून, तिकडील लोक महाराष्ट्रीयांना किती पूज्य मानतात, त्या प्रांतात मराठ्यांच्या आठवणी हल्ली काय आहेत, मराठ्यांची स्मृतीचिन्हे कोठे आहेत, पानिपतच्या या युद्धाशी संबंध असलेले असे कोणते वाक्प्रचार तिकडील लोकात अजून अस्तित्वात आहेत...इ.. गोष्टींचे खुलासेवार वर्णन महाराष्ट्रात अद्याप कोणीही प्रसिद्ध केलेले नाही. या गोष्टीची सत्यासत्यता, युक्तायुक्तता, किंवा योग्यायोग्यता, ठरविण्याचे काम इतिहास भक्तांकडे सोपवून मी आपल्या मुख्य विषयांकडे वळतो....''

इतक्या स्पष्ट शब्दात हे पुस्तक लिहिण्याचे प्रयोजन लिहिल्यावर मनात कसलीही शंका मनात उरत नाही. मी एक पाहिले आहे पूर्वीच्या लेखकांमधे 'लिहिण्याचे प्रयोजन काय ?'' हे लिहिण्याची पद्धतच असावी. हल्ली ती फारशी दिसत नाही.

श्री. जोशींनी पानिपतच्या युद्धभूमीला प्रदिक्षणा घातली ती खालील गावातून. सम्हालका-शिवाह-रसाळ-उग्राखेडी-राजाखेडी-बबैला-नगला-जांबा-सनौली-धनसौली-छाजपूर-निमरी-उंझा-डटोला-पसीना....पानिपत. यापैकी अनेक गावांतून मीही जाऊन आलो होतो, पण श्री. जोशींनी जे ध्येय समोर ठेवले होते ते समोर नसल्यामुळे नुसतेच फिरणे झाले. या पानिपतच्या भोवतालच्या गावांखेरीज मराठ्यांनी घरोंदा, कर्नाल, कुंजपुरा कुरुक्षेत्र येथेही लढाया केल्या असल्यामुळे त्यांनी तेथेही भेटी दिल्या. मीही या सर्व शहरांतून फिरून आलो. श्री जोशी गावागावांतून गावातील प्रतिष्ठीत नागरिकांकडे रहायचे व त्यांच्या मदतीने पुढील मुक्कामाची व्यवस्था करून घ्यायचे. ते म्हणतात, ''या सृष्टीत सज्जन पुष्कळ आहेत व दुर्जन फार थोडे आहे असा माझा अनुभव आहे.''

सम्हालका येथे ए. व्ही. हायस्कूलचे हेडमास्तरांकडे त्यांचा मुक्काम असताना त्यांना कळले की, या प्रांतात जोगी नावाची एक जमात आहे. त्यातही मुसलमान जोगी व हिंदू जोगी असे दोन उपजाती आहेत. या जमातीचा व्यवसाय म्हणजे गाणी गाऊन लोकरंजन करणे. ''भाउकी गीत सुनावगे ?'' असे विचारल्यास आनंदाने होकार देऊन ते ती गाणी गाऊन दाखवतात. सम्हालका येथे श्री. जोशींनी ऐकलेली भाऊंची (सदाशीवरावभाऊ) गाणी.

भाऊंची स्त्री भाऊंना उद्देशून म्हणते ;

अजिक्या सन्मुख योगिनी आयी ।।
रहा चंद्रमा पिछा दबाई ।।

चील, गीध, काक रहे सिरमंडलाई ।।
अजिक्या खाली दोघड नारी आयी ।।

तुम लढने मत जावो साई ।।
तुम बेठो मेहेलोमे आकर ।।
बिना ललाटिया आया वेदाचारी ।।

अजिक्या तुमको समझावे तेरी नारी ।।
लढने मत जावो मान हमारी ।।

मै कहती सीस नमायके ।।

राज्य सब करणीसे पाते है ।।
क्या स्वप्नमे राजा रंक हो जाते है ।।

मुझे किसपे छोडे जाते है ।।
मै तो लढूंगी बांध हत्यार ।।

गिलचोंकी फओज बडी भारी ।।
वो तो अहमदशा खास दुराणी ।।

क्या तुम ल्यावता ब्याहाके राणी ।।
अब चल्या तू मुझे छोडके ।।

**अर्थ :** भाऊंची पत्नी त्यांना लढाईस न जाण्यासाठी विनवीत आहे. पुण्याहून निघताना जे अपशकून झाले त्याची ती आठवण करून देते. समोर योगिनी नक्षत्र, पाठीमागे चंद्र, गिधाडे व कावळे डोक्यावर घिरट्या घालत आहेत, रिकाम्या घागरी घेऊन स्त्री समोर येणे, कपाळावर गंध नसलेला ब्राह्मण समोर येणे. त्यामुळे तुम्ही दक्षिणेतच रहा.

शिवाय राजसत्ता प्राप्त होणे हे मागील जन्मातील कर्मावर अवलंबून असते. राजाचा रंक होण्यास क्षणभर सुद्धा उशीर लागत नाही. राज्य वाढविण्याचा हा लोभ आता पुरे. मी इकडे एकटी कसे आयुष्य काढू ? मी सुद्धा हत्यारबंद होऊन आपल्याबरोबर पानिपतला येते.

गिलच्यांची फौज अवाढव्य आहे व तो अहमदशाह खास दुराणी आहे. मला सोडून दुराण्यांच्या मुलखातील एखादी सवत आणायचा तर तुमची इच्छा नाही ना ?

भाऊसाहेब रागावून आपल्या पत्नीस उत्तर देतात:

हटराणी क्यों बक बक करती है ।।
तू किस राजासे डरती है ।।

मराठे राज्य ब्राह्मणोंकी भरती है ।।
लढते है रणके अंदर जाकर ।।

ना नीच अंश खाते है ।।
ना परस्त्रीको हात लगाते है ।।

त्रिकाली संध्यास्नान वर्त जाते है ।।
रणमे लढते संमुख जाकर ।।

हम ना गिलचोंसे डरने के।।
ना पीछे कदम धरने के ।।

चाहे होजाय डोल मरणके ।।

**अर्थ :** हे स्त्रिये, तू ही निष्कारण काय बडबड चालविली आहेस ? तुला कोणत्या राजाचे एवढे भय वाटते आहे? त्या दुराणीचा पराजय अटळ आहे. मराठ्यांचे राज्य असल्यामुळे ब्राह्मणांच्या हाती सत्ता आहे. आता मात्र रणात जाऊन युद्ध करणे हे आमचे कर्तव्य आहे.

आम्ही सात्विक आहार घेतो. कोणत्याही परस्त्रीकडे वाईट नजरेने पहात नाही. त्रीकाली संध्या करतो व वेळ पडल्यास समशेर चालवितो. आम्ही गिलच्यांना भीत नाही व एक पाऊलसुद्धा मागे हटणार नाही. पराक्रमाने बलाढ्य शत्रूसही जेरीस आणू हे पक्के लक्षात ठेव. आम्ही मरणास भीत नाही.

या गाण्यांवर हरियानवी भाषेचा लहेजा चढला आहे हे स्पष्ट दिसते. ज्यांनी हरियानवी गाणी ऐकली आहेत त्यांना त्याचे कारण स्पष्ट कळेल. ही गाणी ज्या लयीत व सुरात म्हटली जातात त्यासाठी व ठेक्यावर बसविण्यासाठी ती याच पद्धतीने रचली जातात. या कवीने मराठी सेनापतीला व त्याच्या पत्नीस हरियानवी संस्कृतीमधे तोलले आहे. तेही नैसर्गिकच म्हणायास हवे. कारण पानिपतच्या काळात मराठे युद्ध हरले असले तरी त्यांच्या पराक्रमाने त्या प्रांतातील लोकांनी तोंडात बोटे घातली असणार. आत्ताही हरियानामधे मराठ्यांविषयी तसा थोडाफार आदर दिसून येतोच हा पानिपतमुळेच आलेला आहे हे निश्चित. मी जेव्हा या भागात हिंडत होतो तेव्हा बाळासाहेब ठाकऱ्यांबद्दल प्रचंड आदर आढळला. कित्येक लोक मुंबईला खास त्यांना भेटण्यासाठी जात असत. कदाचित शिवसेना हिंदुत्ववादी आहे म्हणूनही असेल आणि याला कारण असेल फाळणी. यांनी प्रत्यक्ष पाहिलेले परत आलेले हिंदू... असो....

भाऊंच्या आईने त्यांना काळजीने युद्धास जाऊ नको असे सांगितले तेव्हा भाऊने काय उत्तर दिले ते बघू या ह्या दोह्यात...

भाउ बोल्या भावसे सुन माता मानी ।।

काबुलसे लादूं मुगलाणी भरवादूं पाणी ।।

याच गावात वयोवृद्ध गावकऱ्यांशी गप्पा मारताना श्री. जोशी यांनी खालील कथा/दंतकथांची नोंद करून ठेवली आहे.

१. सुरजमल जाटाने दिलेला सल्ला भाऊने ऐकला नाही. त्याने मदत देऊ केली असतानाही भाऊने त्यांस दरबारातून हाकलून दिले, ज्याची शिक्षा भाऊंना नंतर मिळाली.

२ मल्हारराव होळकरांना तोफेतून वायबार काढले. खरे गोळे डागलेच नाहीत. (हा तिकडच्या लोकांचा समज असावा. असे काही लढाईत होत नसते. पण मल्हाररावांची भूमिका तिकडे वादग्रस्त समजली गेली आहे.)

३ मुसलमानी सैन्य खरे तर घाबरले होते. पानिपतवरून एक मुसलमान सरदराने भाऊंनी युद्ध जिंकले तर त्यांची मर्जी असावी म्हणून त्यांची भेट घेतली होती.

भुलेखाँ तुवर मिल्या पानिपतवाला ।।<br>
घोडा दुशाला मिले इनाम मोतीकी माला।।

४ मराठे जेव्हा पराभूत होऊन दख्खनच्या दिशेने पळत सुटले तेव्हा दहाबारा घोडी सम्हालखाच्या लोकांनी पकडली होती. ही घोडी इतकी उत्तम होती की, ती राजघराण्यातील व्यक्तींची असावीत असे गावकऱ्यांना वाटले. त्यांनी एका घरात ती बंद करून ठेवली. पैसे घेऊन ती मराठ्यांच्या ताब्यात द्यावीत असेही ठरले. दुसऱ्या दिवशी जेव्हा काही मराठे सरदार आपली घोडी परत मागू लागले तेव्हा त्यांच्याकडे पैशाची मागणी केली गेली. व्यवहार दुसऱ्या दिवशी करायचा ठरला. दुसऱ्या दिवशी गावकरी तेथे गेले तर घोडीही नाहीत व मराठेही नाहीत. ते घोडी घेऊन भिंतीवरून उड्या टाकून पसार झाले होते. या घटनेमुळे त्या गावातील लोक ''मराठे बडे शैतान होते है'' असे अजूनही म्हणतात.

५ 'भाऊ मराठा बडा बाँका लढनेवाला था लेकिन किसीकी मानता नही था.' पानिपतच्या रस्त्यावर शिवाह नावाचे एक गाव आहे. तेथेही श्री. जोशींनी गप्पा मारत गावकऱ्यांकडून माहिती गोळा केली. सुरजमल जाटाला दरबारातून हाकलून देऊन त्याने

फारच मोठी चूक केली.....असे सगळ्यांचे म्हणणे पडले. हे अर्थात नैसर्गिकच म्हणावे लागेल. तसे का झाले याबद्दल परत केव्हातरी मी लिहीन. पण श्री. जोशींना या प्रसंगाचे वर्णन करणारा एक दोहा ऐकण्यास मिळाला.....

...सुरजमल जाट आया भाऊके दरबार ।।
हाथ बांध मुजराकरे जो किया आदाब ।।
नजर दिखा दिया रुपिया एक लाख सत्तर हजार ।।
जनकोजीने दियी सैन कोई सामोविचार ।।

थोडक्यात जनकोजी भाऊच्या कानास लागला व सुरजमल जाटाला हाकलून देण्यात आले.

६. भाऊंच्या सैन्यात फंदफितूरी फार माजली होती. याबद्दलही परत लिहावे लागेल.

उग्राखेडी व निमरी गावाजवळ भाऊंनी टंकसाळ पाडली होती त्यामुळे तेथे त्या काळी बरीच नाणी सापडत असत. त्यांना तेथे 'अश्रफिया' असे म्हणत. थोडक्यात या भागात मराठ्यांनी बरेच धन पुरून ठेवले आहे असा पक्का समज आहे. मी जेव्हा या भागात हिंडलो तेव्हा मला असे कोणी म्हटले नाही; पण एका गावात मात्र (जेथे सध्या उत्खनन चालले आहे) नाव विसरलो, तेथे मात्र एका माणसाने, 'पूर्वी येथे बरेच धन सापडायचे' असे म्हटलेले आठवते. श्री. जोशींनी या बाबतीत रसाळू येथील गावकऱ्यांनी सांगितलेली गंमतशीर गोष्ट सांगितली ती अशी...........

(क्रमशः)

**– जयंत कुलकर्णी**
ज्येष्ठ अभ्यासक
पुणे

•••

(पृष्ठ क्र.१३ वरून – **ओळख नवीन कायद्याची**)

नवीन सुधारणा आणि प्रस्तावित बदल

२०१९ मध्ये सुधारणा विधेयक सादर करण्यात आले, ज्यामध्ये खालील सुधारणा सुचविण्यात आल्या:

- 'मुलं' यामध्ये सावत्र मुलं, दत्तक मुलं आणि कायदेशीर पालकांचा समावेश.
- १०,००० च्या निर्वाह मर्यादेचा हटवण्याचा प्रस्ताव, ज्यामुळे न्यायाधिकरण परिस्थितीनुसार योग्य रक्कम ठरवू शकते.
- पालकांचा परित्याग केल्यास कठोर शिक्षा.
- राज्य सरकारने अधिक वृद्धाश्रम आणि वैद्यकीय सेवा सुरू कराव्यात.

**भविष्यातील दिशा**

- जागृती मोहीम : सरकार आणि स्वयंसेवी संस्थांनी वृद्धांच्या हक्कांविषयी अधिक जनजागृती करावी.
- कायदेशीर प्रक्रिया वेगवान करणे : न्यायालयीन निर्णय वेळेत देण्यासाठी सुधारणा कराव्यात.
- उत्तम आरोग्यसेवा : वृद्धांसाठी अधिक विशेष वैद्यकीय सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे.
- कौटुंबिक मूल्यांची जपणूक: वृद्ध आई-वडिलांची काळजी घेण्याची जबाबदारी समाजाने स्वीकारावी.

**निष्कर्ष**

पालक आणि ज्येष्ठ नागरिकांचे देखभाल व कल्याण अधिनियम, २००७ हा वृद्धांच्या संरक्षणासाठी अत्यंत महत्त्वाचा कायदा आहे. जरी हा कायदा प्रभावी असला, तरीही त्याची योग्य अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. कायदेशीर तरतुदी मजबूत करणे, जनजागृती करणे आणि सामाजिक आधारव्यवस्था सुधारणे आवश्यक आहे. भविष्यातील वृद्धसंख्येच्या वाढत्या प्रमाणाचा विचार करता, वृद्धांसाठी अधिक सहानुभूतीशील आणि प्रभावी धोरणे राबविणे महत्त्वाचे ठरेल.

**– डॉ. रुपाली श्याम जामोदे**

# परिसर वार्ता

– संकलित

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

शनिवार २५ जानेवारी २०२५ रोजी MKCL Olympiad Movement (MOM ONLINE EXAM) परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्याचा बक्षीस समारंभ पार पडला. वि. प्र. म. च्या तंत्रनिकेतन कॉलेज, IT Center च्या प्रमुख सौ. हेमांगी सावंत, सौ. शीला आसवले आणि शाळेच्या मा. मुख्याध्यापिका कल्पना वाघुले आणि ज्येष्ठ शिक्षिका सौ. मीनाक्षी कुमावत यांच्या हस्ते MKCL कडून आलेल्या Science kit आणि प्रमाणपत्र यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीस रूपाने देण्यात आले. यशस्वी विद्यार्थी पुढीलप्रमाणे :-

१. वेदांग महेश परळकर ८अ
(राज्यस्तरीय गुणानुक्रम २६१ वा)

२. जुईली आदेश ठाणेकर ८अ
(राज्यस्तरीय गुणानुक्रम २५८ वा)

१. कौशल यशवंत गांगुर्डे ८अ
(जिल्हास्तरीय गुणानुक्रम)

२. आर्यन सचिन यादव ८ब
(जिल्हास्तरीय गुणानुक्रम)



दि. २५ जानेवारी रोजी सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त शपथ घेतली.





दि.२५ जानेवारी रोजी वाहतूक सुरक्षा सप्ताह निमित्त सर्व विद्यार्थ्यांसाठी वाहतुकीचे नियम सांगणारे एक प्रभावी पथनाट्य सादर केले गेले.



जि.प. शिक्षण विभाग यांचेतर्फे वागळे इस्टेट ठाणे येथे दि.२६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त इ.७वी च्या स्काऊट गाईड विद्यार्थ्यांना राष्ट्रगीत, राज्यगीत व ध्वजगीत म्हणण्याची संधी मिळाली. या प्रसंगी शिक्षण विभागातील विविध अधिकारी, तसेच श्री. तळेले, सौ. बोरवणकर उपस्थित होते.



दि. २७ जानेवारी रोजी इ. ९वी च्या विद्यार्थ्यांसाठी अंधेरी मधील 'भारतीय मानक ब्युरो' या ठिकाणी शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली. इ. ९ वीचे एकूण २९ विद्यार्थी, तसेच श्री. शिरापुरी, सौ. पूनम जाधव यात सहभागी झाले होते. विविध पदार्थांचे परीक्षण



प्रयोगशाळेत कसे केले जाते या संबंधित तेथील तज्ज्ञ व्यक्तीकडून विद्यार्थांना मार्गदर्शन करण्यात आले.

दि. २७ व २८ जानेवारी रोजी स्काउट गाईड यांच्या 'खरी कमाई' उपक्रम अंतर्गत



इ. ६वी, ७वी, ८वी च्या विद्यार्थ्यांनी विविध पदार्थांचे स्टॉल लावले होते. या महोत्सवाचे उद्‌घाटन संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या शुभ हस्ते झाले. या वेळी स्काउट गाईडचे अधिकारी, संस्थेचे कार्यवाह श्री. मराठे, संस्थेचे सदस्य डॉ. महेश बेडेकर, तसेच श्री. रसाळ उपस्थित होते.

दि. २८ जानेवारी रोजी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची वार्षिक आरोग्य तपासणी केली गेली.



दि. ३० जानेवारी रोजी इ. ६वी, ७ वी, ८वी च्या स्काउट गाईड विद्यार्थ्यांचे एक दिवसीय शिबिर 'नेचर हंट' खोपोली येथे आयोजित करण्यात आले. या शिबिरातून ध्वजारोहण, इ. ६वी चा दीक्षांत समारंभ, विविध साहसी खेळ असे भरगच्च उपक्रम घेण्यात आले. या शिबिरासाठी शाळेच्या मुख्याध्यपिका श्रीमती कल्पना वाघुले, तसेच श्री. तळेले, श्री. जाधव, सौ. बोरवणकर, सौ. बोरूळकर हे सर्व शिक्षक उपस्थित होते.



दि. ०५ फेब्रुवारी रोजी इ. ५ वी, ६ वी, ७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी ज्ञान प्रबोधिनी ठाणे केंद्र यांचे तर्फे 'ओळख स्पर्शाची' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना चांगला व वाईट स्पर्श ओळखून या बाबत काय काळजी घ्यावी याचे मार्गदर्शन करण्यात आले.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

**१) ९ जानेवारी २०२५ –**
**नर्सरी – बडबडगीत दिवस (Song day)**
**ज्यूनियर व सिनीयर – राईम डे**

नर्सरीच्या मुलांना भाषेचे बंधन न ठेवता कुठलेही एक गाणे हावभावांसहित सादर करायचे होते.

ज्यूनियर व सिनीयरच्या मुलांना एका इंग्रजी गाण्याचे सादरीकरण करणे.

पालकांनी मुलांकडून करून घेतलेली तयारी मुलांच्या सादरीकरणातून दिसून आली.

**२) १५ जानेवारी २०२५ – मकर संक्राती**

मकर संक्रांत देशभर विविध नावांनी, पद्धतींनी साजरी केली जाते. या सणाबद्दलची माहिती परिपाठात शिक्षकांनी दिली. सूर्यदेवाचा श्लोक म्हटला. 'तिळगुळ घ्या गोड गोड बोला' असं म्हणून शिक्षकांनी दिलेल्या तिळाच्या वडीचा मुलांनी आस्वाद घेतला. पुढील उपक्रम या निमित्ताने घेतले गेले.

नर्सरी – पतंगाचे – चित्र (स्टेनसिल) रंगवणे.
ज्यूनियर – घोटीव कागदाचा पतंग करणे.
सिनीयर – चित्रकलेच्या वहीत विविध आकारांचे पतंग काढणे.

**३) १७ जानेवारी २०२५ – सहल**

मुलांसाठीचा आनंददायी उपक्रम म्हणजे सहल. यावर्षी 'बच्चा पाटी', मानपाडा, ठाणे येथे नेण्यात आली. सकाळी ९ वाजता मुलं शाळेत आली. ९च्या सुमारास शाळेतून ३ बसेसमधून जवळपास १६९ विद्यार्थी, ६ शिक्षक, मावशी, काका अशी सहल निघाली. २०/२५ मि. तच आम्ही बच्चा पार्टीला पोहोचलो. सामान बॅगा, सॅन्डलस् जागेवर ठेवून लगेच मुलं तिथल्या खेळाकडे धावत गेली. जवळपास १२.१५ च्या सुमारास नर्सरी, मग ज्युनियर, सिनीयर या क्रमाने मुलांनी हात धुऊन घेतले. श्लोक म्हणून जेवणाच्या मेनूवर म्हणजे पावभाजी आणि नूडल्स यावर ताव मारला. यानंतर गप्पा, गाणी, गोष्टी यात मुलं रमली. मुलांनी आवडीच्या गाण्यांवर नृत्य केले. अंदाजे २.१५ च्या सुमारास परतीच्या वाटेला लागून दमलेली आमची चिमुकली २.३०/४० पर्यत पालकांबरोबर घरी परतली. सिनीयर के.जी. स्टार ग्रुपच्या सौ. काजल मौर्य या पालक प्रतिनिधी म्हणून सहलीला आल्या होत्या.

**४) नर्सरी – सॅलेड उपक्रम – ८ जानेवारी**

अनेक उपक्रमांपैकी एक म्हणजे भाज्यांची ओळख करून देण्याचा सॅलेडचा उपक्रम. आपण भाज्या का खाल्ल्या पाहिजेत याची माहिती शिक्षकांनी सांगितली. काकडी, बीट, गाजर, टोमॅटो इ. भाज्या शिक्षकांनी आणल्या. त्या स्वच्छ धुऊन चिरून मीठ व चाट मसाला घालून मुलांना खाण्यासाठी दिल्या गेल्या.

**५) २४ जानेवारी – प्रजासत्ताक दिवस**

भारताच्या प्रजासत्ताक दिवसाचे आयोजन मुलांसाठी २४ जानेवारी रोजी शाळेत करण्यात आले होते. मुलांनी झेंड्याचे रंग असलेले कपडे परिधान केले होते. नर्सरी व ज्यूनिअरच्या मुलांनी झेंडा हातात घेऊन देशभक्तीपर गाणी गायली. सिनीयरच्या मुलांनी शाळेच्या आवारात 'मार्च पास्ट' करून झेंड्याला सलामी दिली.

ज्यूनियर – झेंड्याच्या रंगाचे फुगे (स्पंजच्या साहाय्याने ठसेकाम)

सिनीयर – तिरंगी पतंग चित्रकला वहीत काढणे.

**६) ३० जानेवारी – नर्सरी ज्यूनियर – शो अ‍ॅन्ड टेल सिनीयर – वक्तृत्व**

नर्सरी व ज्यूनियरच्या विद्यार्थ्यांना कोणतीही वस्तू/चित्र/खेळणं हातात घेऊन त्याविषयी ४/५ ओळी इंग्रजीत बोलायचे होते.

सिनीयरच्या विद्यार्थ्यांना माझा आवडता पदार्थ आणि माझा मित्र/मैत्रीण यापैकी एका विषयावर ७/८ ओळी बोलणे अपेक्षित होते. सर्वच मुलांकडून पालकांनी करून घेतलेली तयारी त्यांच्या सादरीकरणातून जाणवत होती.

**७) १ फेब्रुवारी – वार्षिक कला व विज्ञान प्रदर्शन**

दरवर्षीप्रमाणे यावर्षी १ फेब्रुवारी कला व विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. मुलांनी

पालकांच्या मदतीने केलेल्या अनेक शोभेच्या वस्तू, तोरणं या सर्वांने पूर्व प्राथमिक विभाग सजला होता.

नर्सरी विभाग – स्थूल व सूक्ष्म स्नायूंच्या वाढीसाठी उपयुक्त असे उपक्रम ठेवण्यात आले होते.

ज्युनियर – गणितातील पूर्ण/अर्धी संकल्पना, प्राण्यांचे उपयोग.

सिनीयर – महाराष्ट्रातील सण, भारतातील प्रसिद्ध खेळाडू व समुद्रापासून मिळणाऱ्या गोष्टी, भारतातील प्रसिद्ध देवळे असे उपक्रम मांडून त्याची माहिती सर्वांना दिली. आमच्या या छोट्या मुलांच्या आत्मविश्वासाचे, पाठांतराचे उपस्थितांना आश्चर्य व कौतुक वाटले.

**८) ५ फेब्रुवारी – मटार सोलणे**

रोजच्या जीवनातील गोष्टींचा परिचय करून देत या उपक्रमाचा एक भाग म्हणून मटार सोलणे (भाजी स्वच्छ करणे) हा उपक्रम घेण्यात आला. ज्युनियर व सिनीयरच्या मुलांनी सोललेले दाणे स्वच्छ धुऊन, उकडण्यात आले. त्यात चाट मसाला घालून मुलांना देण्यात आले.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

**आंतरराष्ट्रीय Spell Bee परीक्षेचा निकाल**

**स्तर दुसरा – प्रादेशिक / राज्यस्तरीय स्तर**

Spell Bee परीक्षेचा निकाल जाहीर करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. विद्यार्थ्यांनी प्रादेशिक / राज्यस्तरीय स्तरावर उत्तम कामगिरी बजावली आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!



* २ विद्यार्थी उपलब्ध श्रेणीत आंतरशालेय टॉपर आहेत.
* ५ विद्यार्थ्यांना अचिव्हमेंट इन डिस्टिंक्शनचे प्रमाणपत्र दिले जाईल.
* शाळेतील सर्वोत्तम गुण मिळवणारे विद्यार्थी :

| | विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता | प्राप्त गुण |
|---|---|---|---|
| १ | कु. वर्तक प्रथमेश पुष्कराज | १ ली | ९१ |
| २ | कु. गोखले अन्वी अजय | ३ री | १०० |

* इयत्तेतील सर्वोत्तम गुण मिळवणारे विद्यार्थी :

| | विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता | प्राप्त गुण |
|---|---|---|---|
| १ | कु. पाष्टे मीरा प्रीतम | १ ली | ८९ |
| २ | कु. वीरकर स्वरांग निनाद | २ री | ८७.५ |
| ३ | कु. वाडेकर सौमिल शैलेश | ३ री | ७५.५ |
| ४ | कु. चव्हाण अवनीश तुषार | ४थी | ८३ |
| ५ | कु. धोंगडे स्पृहा योगेश | ४थी | ८३ |

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यमिक विभाग

- **स्पेल बी आंतरराष्ट्रीय प्रादेशिक/राज्यस्तरीय स्पर्धेचे निकाल. (द्वितीय पातळी)**



| अनु. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता | गुण |
|---|---|---|---|
| १ | सान्वी मुडबिद्री | ५ क | १०० |
| २ | अथर्व रानडे | ५ क | ९४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | अद्वैत वझे | ५ क | ९० |
| ४ | अर्णव दांडेकर | ६ अ | ९० |
| ५ | कार्तिकी शिंदे | ६ अ | १०० |



रोटरी क्लब ऑफ ठाणे हिल्सने १८ जानेवारी २०२५ रोजी ठाणे येथील काशिनाथ घाणेकर सभागृहात SAEVUS इको अचीवर्स क्विझ २०२४-२५ स्पर्धा आयोजित केली होती. आमचे विद्यार्थी श्री. अमोघ गाडगीळ इ. ७वी-अ, श्री. अन्वेष भोसले इ. ६वी-क, श्री. ओजस मोडक इ. ५वी-अ यांनी प्रथम क्रमांक पटकावला आणि राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र ठरले.



ग्लोबल मॅथ्स सायन्स एज्युकेशनने आयोजित केलेल्या बौद्धिक गणित स्पर्धेत इयत्ता ५वी च्या मिहिका काळे हिने ७वा क्रमांक मिळवला. कांस्य पदक आणि प्रमाणपत्र देऊन तिला गौरवण्यात आले.

रोटरी क्लब ऑफ ठाणे उत्तर आणि ISHRAE ठाणे चॅप्टर यांनी चित्रकला स्पर्धा आयोजित केली. या स्पर्धेत ध्रुवेन शिंदे या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक पटकावला. तसेच आदित्य सुर्वे याला उत्तेजनार्थ पुरस्कार मिळाला.





दहावीच्या यशोधन उदय पेंडसेने राज्यस्तरीय भूगोल प्रतिभा शोध परीक्षा २०२४-२५ मध्ये १०० पैकी ९६ गुण मिळवून सुवर्णपदक पटकावले.

## जोशी-बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त)

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या BBA विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी लॉजिस्टिक्स सेक्टर स्किल कौन्सिलद्वारे मार्गदर्शन व्याख्यानाचे आयोजन गुरुवार दिनांक १४ नोव्हेंबर २०२४ रोजी करण्यात आले होते. यावेळी प्रा. गणेशन शिवपुनम, प्रमुख - लॉजिस्टिक सेक्टर स्किल कौन्सिलमधील शैक्षणिक उपक्रम आणि प्रा. डॉ. गायत्री हरीश ज्या शाळांमधील शैक्षणिक गळती आणि कौशल्य विकास उपक्रम यासाठी कार्यरत आहेत, त्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यात एकूण ४३ विद्यार्थी व २ प्राध्यापक सहभागी झाले.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या NSS युनिट तर्फे 'ये दिवाली माय भारत वाली' या उपक्रमाचे आयोजन दिनांक २७ ऑक्टोबर २०२४ ते दिनांक ३० ऑक्टोबर २०२४ या दरम्यान करण्यात आले होते.

दिनांक २७ ऑक्टोबर रोजी महाविद्यालय परिसरात या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. ज्यात एकूण ६४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. दिनांक २८ ऑक्टोबर रोजी ठाणे येथील मुख्य मार्केट परिसर - कोपिनेश्वर मंदिर येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले.यात एकूण ६० विद्यार्थी सहभागी झाले. दिनांक २९ ऑक्टोबर रोजी ठाणे स्टेशन परिसरात वाहतूक नियंत्रण विभागात ट्रॅफिक नियंत्रण करण्याचे काम विद्यार्थ्यांनी केले, यात ६५ विद्यार्थी सहभागी झाले.

दिनांक ३० ऑक्टोबर रोजी 'सेवा से सिख' उपक्रमात ठाणे येथील वाडिया हॉस्पिटल येथे काम

केले. यात एकूण ६३ विद्यार्थी सहभागी झाले.

महाविद्यालयाच्या NSS युनिट व नायर हॉस्पिटल, मुंबई यांच्या तर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन दिनांक १२ नोव्हेंबर २०२४ रोजी करण्यात आले होतें. यात NSS युनिटच्या २२ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. यावेळी रक्ताच्या एकूण ६२ युनिट जमा करण्यात आले.

महाविद्यालयाच्या NSS युनिट व ग्रीन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने एकूण ४३ विद्यार्थ्यांनी दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत ठाणे मतदान केंद्र परिसरात स्वयंसेवक म्हणून कार्य केले.

महाविद्यालयाच्या वाणिज्य (फायनान्शियल विभाग) शाखेतर्फे गुरुवार, दिनांक १ नोव्हेंबर २०२४ रोजी 'मुहूर्त ट्रेडिंग' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अनंत इनवेस्टमेंटच्या श्री. सुबोध नार्वेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या उपक्रमात ५४ विद्यार्थी व २ प्राध्यापकांनी सहभाग घेतला.

महाविद्यालयाच्या डॉ. नीलम शेख, लेखा आणि वित्त विभागाच्या समन्वयक आणि सहाय्यक प्रा. श्री. नीतिन पागी, व्यवस्थापन अभ्यास विभागाचे समन्वयक यांना ICSI ठाणे शाखेत ३० नोव्हेंबर २०२४ (शनिवार) रोजी झालेल्या शिक्षक परिषदेत ICSI, ठाणे तर्फे सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या कौशल्य विकास आणि उद्योजकता सेल तर्फे 'चांगले सादरीकरण कसे करावे' यासाठी आवश्यक कौशल्ये या अंतर्गत व्याख्यानाचे आयोजन दिनांक २८ नोव्हेंबर, २०२४ रोजी महाविद्यालयाच्या कात्यायन सभागृहात करण्यात आले होते. यावेळी श्री. विक्रांत वेदांत आणि हेता देसाई यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी एकूण १९७ विद्यार्थी सहभागी झाले होते.

सादरीकरण तयार करण्यासाठी कॅनव्हा, पीपीटी, प्रेझी, गुगल स्लाइड्स सारख्या योग्य साधनांचा वापर करून सादरीकरण उत्तमप्रकारे कसे करता येईल, याचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना करण्यात आले.

महाविद्यालयाच्या कौशल्य विकास आणि उद्योजकता सेल तर्फे 'VFX ग्राफिक्स फिल्म मेकिंग इ. मध्ये आवश्यक कौशल्ये' यावर अतिथी व्याख्यान दिनांक २९ नोव्हेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आले होते. यात एकूण १६५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

महाविद्यालयाच्या बी.कॉम आणि एम. कॉम. (लेखा आणि वित्त) तर्फे आयोजित एक दिवसीय आंतरमहाविद्यालयीन चर्चासत्र लूम ते लेजर: परंपरेतून आर्थिक यश विणणे या विषयावर आयोजित करण्यात आले होते. दिनांक ०७ डिसेंबर २०२४ रोजी कात्यायन सभागृहात याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी

१. CS.S.N. विश्वनाथन (अध्यक्ष ICSI ठाणे शाखा– की नोट स्पीकर)

२. डॉ. सचिन पाटील (ब्रँड ॲम्बेसेडर मिखाडी– प्लेनरी स्पीकर)

३. श्री. जितेंद्र पेसवानी (CFA सनदीधारक – पॅनेल सदस्य)

४. कु. अपर्णा दली (फॅशन स्कॉलर – पॅनलिस्ट) यांनी 'द फॅब्रिक ऑफ फायनान्स: पारंपारिक रूट्स, मॉडर्न शूट्स' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

एकूण २४० विद्यार्थी व १० प्राध्यापकांनी यात सहभाग घेतला.

**प्राच्यविद्या अभ्यास संस्था आणि विद्या प्रसारक मंडळाच्या के. ग. जोशी कला आणि ना. गो. बेडेकर वाणिज्य (स्वायत्त) महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने**

**'गाथा प्राचीन महाराष्ट्राची भाग १' या पुस्तकाच्या द्वितीय आवृत्ती प्रकाशनाचा सोहळा संपन्न.**

दिनांक ०७ डिसेंबर २०२४ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या पाणिनी सभागृहात प्रा. अंकुर काणे, सहलेखक सागर सुर्वे, संपदा कुलकर्णी, श्वेता काजळे यांच्या 'गाथा प्राचीन महाराष्ट्राची भाग - १' या ग्रंथाच्या द्वितीय आवृत्तीचा प्रकाशन सोहळा संपन्न झाला. संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, आणि श्री. मनोज केळकर (प्रकाशक - मर्वेन टेक्नॉलॉजी) यांच्या हस्ते सदर पुस्तकाचे प्रकाशन संपन्न झाले. यावेळी सौ. सुमेधा बेडेकर, पुण्याच्या डेक्कन कॉलेजच्या जैविक मानववंशशास्त्र विषयाच्या प्राध्यापिका डॉ. वीणा मुश्रीफ, पुरातत्त्व अभ्यासक डॉ. शिवेंद्र काडगावकर, इतिहास संकलन समिती कोकण प्रांत सचिव श्री. चंद्रकांत जोशी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमात प्राच्यविद्या अभ्यास संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेण्यात आला. यावेळी जोशी-बेडेकर महाविद्यालय आणि प्राच्यविद्या अभ्यास संस्था, यांच्या संयुक्त विद्यमाने 'Certificate course in Archaeology' हा अभ्यासक्रम यशस्वीपणे पार पाडलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. सोबतच प्रा.अंकुर काणे यांचे 'इतिहास आणि भूगोल एक अतूट नाते' या विषयावर व्याख्यान पार पडले.

सदर कार्यक्रमास १०० विद्यार्थी, तसेच प्राध्यापक वृंद व इतिहासप्रेमी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रुपेश महाडिक, तर आभार प्रदर्शन प्रा. मानसी जंगम यांनी केले.

जोशी - बेडेकर महाविद्यालयाच्या NEP अंमलबजावणी सेल तर्फे दिनांक ०९ डिसेंबर रोजी Community engagement program विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी मार्गदर्शन केले. एकूण २१ प्राध्यापकांनी यात सहभाग घेतला.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या अतुल्य समावेशी सेलने 'दृष्टीहीन' विद्यार्थ्यांमध्ये समावेशकतेला चालना देण्यासाठी, आत्मविश्वास वाढवण्यासाठी आणि टीमवर्क वाढवण्यासाठी 'अंध क्रिकेट प्रशिक्षण सत्र १२ डिसेंबर २०२४' रोजी सुरू केले. सदर विद्यार्थ्यांना प्रशिक्षक म्हणून श्री. अजय मुनी (CABM) क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइंड महाराष्ट्रचे प्रशिक्षक) मार्गदर्शन करत आहेत.

जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या बी.कॉम.(लेखा आणि वित्त) तर्फे दिनांक ११ डिसेंबर २०२४ रोजी ठाणे रेल्वे स्थानकावरील घोषणा विभागाला भेट दिली. यावेळी एकूण १० विद्यार्थी उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या BAMMC विभागातर्फे फिल्म सिटी आणि व्हिसलिंग वुड्स संस्थेला औद्योगिक भेटीचे शनिवार, दिनांक १४ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आले होते. यावेळी एकूण ९४ विद्यार्थी आणि ३ प्राध्यापक उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी भारतीय चित्रपट आणि टेलिव्हिजन उद्योगाचे प्रमुख केंद्र असलेल्या फिल्म सिटीच्या भेटीदरम्यान, विद्यार्थ्यांनी फिल्मसिटीचा इतिहास आणि चित्रपट निर्मितीसाठी महत्त्वाच्या विकासाबद्दल जाणून घेतले. या औद्योगिक भेटी दरम्यान व्हिसलिंग वुड्स इंटरनॅशनल, संस्थांचा दौरा करताना विद्यार्थ्यांना आधुनिक पायाभूत सुविधांसह संस्थेची एकूण ओळख करून देण्यात आली.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या BAMMC च्या प्रथम वर्ष विद्यार्थ्यांसाठी प्रसिद्ध स्टुडिओ आणि नॅशनल म्युझियम ऑफ इंडियन सिनेमा येथे औद्योगिक भेटीचे आयोजन शनिवार, दिनांक ७ डिसेंबर २०२४ रोजी करण्यात आले होते. या वेळी एकूण ९४ विद्यार्थी व २ प्राध्यापक सहभागी होते.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या BAMMC शाखा (SYBAMMC इंग्रजी आणि मराठी) विभागाची गोरेगाव फिल्म सिटीला औद्योगिक भेट शुक्रवार, १३ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती. यावेळी एकूण ९७ विद्यार्थी व २ प्राध्यापक उपस्थित होते.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या 'पत्रकारिता आणि जन संज्ञापन विभाग' तर्फे 'ठाणे वैभव' वृत्तपत्राची नवीन आवृत्ती युवा प्लस शुक्रवार, दिनांक २९ नोव्हेंबर २०२४ रोजी लाँच करण्यात आली. यावेळी एकूण ५८ विद्यार्थी उपस्थित होते.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या पत्रकारिता आणि जन संज्ञापन विभागातील एकूण ५१ विद्यार्थ्यांनी बुधवार, दिनांक २७ नोव्हेंबर २०२४ रोजी Arena Animation तर्फे निमेशन आणि ग्राफिक्स या विषयावरील आयोजित चर्चासत्रात सहभाग घेतला.

दिनांक १४ सप्टेंबर २०२४ रोजी महाविद्यालयाच्या विवेकानंद अभ्यास मंडळातर्फे जागतिक बंधुत्व दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या A १०३ या वर्गात सदर कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी एकूण ३३ विद्यार्थी उपस्थित होते.

महाविद्यालयाचे स्वामी विवेकानंद अभ्यास मंडळ आणि NSS युनिट यांच्या संयुक्त विद्यमाने युवा नेतृत्व कार्यक्रम दिनांक १६ नोव्हेंबर २०२४ रोजी आर्टस बिल्डिंग टेरेस वर संपन्न झाला. यावेळी एकूण १९ विद्यार्थी उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या विवेकानंद अभ्यास मंडळातर्फे दिनांक १९ नोव्हेंबर २०२४ रोजी कला इमारतीच्या - १०२ या वर्गात 'आपला आत्मविश्वास कसा वाढवावा' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी श्रीमती सीमा नित्सुरे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या इतिहास विभागातर्फे दिनांक ४ डिसेंबर २०२४ रोजी मुंबई पोर्ट ट्रस्ट येथे शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली होती. यावेळी एकूण ४७ विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी मुंबई पोर्ट ट्रस्टचे पर्यवेक्षक श्री. कोशिस कोळी आणि श्री. किशोर जुवेकर यांनी पोर्ट बाबत मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. त्यांनी मुंबईच्या पोर्ट आणि डॉकयार्डचा इतिहास समजावून सांगितला. त्यांनी पोर्ट आणि डॉकयार्डची कार्यप्रणाली समजावून दिली.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या NSS युनिटचा ७ दिवसांचे निवासी शिबिर उंबरमाळी - कसारा येथे आयोजित करण्यात आले होते.

रविवार, १५ डिसेंबर २०२४ ते शनिवार, २१ डिसेंबर २०२४ या दिवसात सदर निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खालील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

- श्री. भरत गोडांबे (निसर्ग शिक्षक)
- श्री. रुपेश महाडिक (सहायक प्राध्यापक)
- अॅड. लालचंद यादव (मुंबई उच्च न्यायालय)
- डॉ. श्वेता अहीरे (सहायक प्राध्यापक)
- श्रीमती रेणू वर्मा (NSS क्षेत्र समन्वयक)
- श्री. आयुष पारेख (NSS माजी विद्यार्थी)
- श्री. रोहित कोंडाळेकर (अव्हान शिबिर प्रशिक्षक)
- कु. नम्रता करांडे (अव्हान शिबिर प्रशिक्षक)

यावेळी खालील उपक्रम राबविण्यात आले.

- शारीरिक तंदुरुस्ती: शारीरिक तंदुरुस्तीवरील व्यावहारिक सत्रे
- योग सत्रे
- शाळेत शिक्षण
- बंधारा बांधकाम
- ग्रीन वॉल

- लीफलिंक (QR कोड)
- आरोग्य आणि स्वच्छतेची जागरूकता
- कौशल्य विकास
- टीम लीडिंग आणि एकता
- सामाजिक एकात्मता
- वैयक्तिक वाढ आणि चिंतन

या शिबिरात एकूण १०० विद्यार्थी सहभागी झाले होते.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या लेखा आणि वित्त विभाग (SYBAF) विभागातर्फे मूट कोर्ट केस स्टडी स्पर्धेचे आयोजन बुधवार, १५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ७:३० L – १२ (मूट कोर्ट), लॉ बिल्डिंग येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी न्यायाधीश म्हणून डॉ. विनोद चांदवानी यांनी कामकाज पाहिले. यावेळी एकूण १७५ विद्यार्थी उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या महिला विकास कक्ष (WDC) तर्फे सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रम बुधवार, ३ जानेवारी २०२५ आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रा. मानसी जंगम यांनी सावित्रीबाई फुले यांची भूमिका साकारत नाट्यछटा सादर केली. यावेळी एकूण ६६ विद्यार्थी सहभागी होते.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या महिला विकास कक्ष (WDC) तर्फे 'कामाच्या ठिकाणी महिलांची लैंगिक छळाची समस्या' या बद्दल जनजागृती करणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बुधवार, दिनांक ८ जानेवारी २०२५ रोजी सदर कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी डॉ. मृण्मयी थत्ते यांनी मार्गदर्शन केले. यावेळी एकूण ८३ विद्यार्थी उपस्थित होते.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या महिला विकास कक्ष (WDC) तर्फे कार्यस्थळी महिलांच्या लैंगिक छळाविरुद्ध POSH अधिनियम, २०१३ याची माहिती देणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शनिवार, ११ जानेवारी, २०२५ रोजी महाविद्यालयाच्या कात्यायन सभागृहात सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. ॲड. नीता कर्णिक, वरिष्ठ वकील, बॉम्बे उच्च न्यायालय यांनी यावेळी मार्गदर्शन केले. यावेळी एकूण १९ विद्यार्थी व एकूण ३३ शिक्षक त्याचसोबत ०६ शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी झाले होते.

महाविद्यालयाच्या ग्रीन क्लब तर्फे फार्मा बिन प्रकल्प आयोजन १९ ऑगस्ट २०२४ ते २२ जानेवारी २०२५ या कार्यकाळात करण्यात आले होते.

कचऱ्यातील औषधांचा योग्यरीत्या निपटारा करणे आणि पर्यावरणपूरक कचरा व्यवस्थापनाला प्रोत्साहन देणे, सोबतच बिनमधून ३० किग्रॅ पेक्षा जास्त कचऱ्यातील औषधे गोळा करण्यात आली. RNisarg फाऊंडेशनला औषधे पाठवण्यात आली, जेथे औषधे वेगळी केली गेली. १२००°C वर जाळून त्यांचा निपटारा करण्यात आला. या पुढाकारामुळे योग्य निपटारा आणि औषध कचऱ्याचे पुनर्वापर यामुळे सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरणीय स्थिरतासाठी प्रयत्न करण्यात आले. यात एकूण ४२० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या बी.कॉम. लेखा आणि वित्त विभागातर्फे Navigating Growth: - Comprehensive Exploration of Macroeconomics and the Indian Economy या विषयावर पोस्टर प्रदर्शन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक २४ जानेवारी २०२५ रोजी करण्यात आले होते. एकूण ३८२ विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदवला.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या पत्रकारिता आणि जनसंज्ञापन विभागातर्फे RTA - महाविद्यालय वार्षिक वृत्तपत्र, शैक्षणिक वर्ष २०२४-२५, चे १५वे संस्करण अहवाल गुरुवार, दिनांक १६ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रकाशित करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या

म्हणून श्रीमती विनया देशपांडे, कार्यालय प्रमुख महाराष्ट्र द हिंदू या उपस्थित होत्या. यावेळी एकूण १०२ विद्यार्थी उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या सेल्फ फायनान्स विभागातर्फे CEP साठी प्राध्यापकांसाठी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन बुधवार, २९ जानेवारी २०२५ रोजी करण्यात आले होते.

कु. सोनाली पाटणकर (संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, रिस्पॉन्सिबल नेटिजम) यांनी यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त)

**वनस्पतिशास्त्र विभाग**

वनस्पतिशास्त्र विभागातर्फे Ecopulse: Monitoring Beats of Ecosystem या विषयावर १४-१५ फेब्रुवारी २०२५ रोजी दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात येणार आहे. या परिषदेची पूर्व तयारी म्हणून दोन कार्यशाळा आयोजित करण्यात येणार होत्या. त्यातील दुसरी परिषदपूर्व कार्यशाळा २५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११.३० ते दुपारी २.०० या कालावधीत संपन्न झाली. या कार्यशाळेला २३१ विद्यार्थी आणि १३ शिक्षक एवढा मोठा प्रतिसाद मिळाला.

या कार्यशाळेत श्री. अभिजीत काळे (उपप्राचार्य - विनाअनुदानित विभाग, माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख), डॉ. अश्विनी टिळक (सहाय्यक प्राध्यापक, जैवतंत्रज्ञान विभाग) आणि सौ. पूर्वी शाह (सहाय्यक प्राध्यापक, जैवतंत्रज्ञान विभाग) या तीन तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. श्री. अभिजीत काळे यांनी 'Tools used in Research Project Data analysis' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यानंतर डॉ. अश्विनी टिळक यांनी 'Data to Display: Crafting impactful scientific poster' हा विषय अतिशय सोप्या पद्धतीने समजावून सांगितला. सौ. पूर्वी शाह यांनी पोस्टर च्या माध्यमातून संशोधनाचे सादरीकरण करताना घ्यावयाच्या सूक्ष्म गोष्टींबद्दल चर्चा केली. त्यानंतर विविध विभागाच्या कु. वर्षा डी. दुबे, कु. सिया एम. पाटील, कु. पूजा बी. कुमावत, कु. स्वप्नाली कोरडे या ४ विद्यार्थ्यांनी त्यांचे संशोधन प्रकल्प सादर केले.

सहाय्यक प्राध्यापक श्री सुधीर भोसले यांनी या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले तर कु. स्नेहल भोर या प्रथम वर्ष वनस्पती शास्त्र विभागाच्या विद्यार्थिनीने पसायदान सादर करून कार्यक्रमाची सांगता झाली.



**क्विक हिल फौंडेशन 'सायबर शिक्षा पुरस्कार २०२५'**

क्विक हिल फौंडेशन तर्फे 'Quickheal National Award 2025' हा पुरस्कार वितरण सोहळा १२ जानेवारी २०२५ रोजी संपन्न झाला. या पारितोषिक वितरणात बा. ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालयाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाची विद्यार्थिनी श्रुती सुनील शिरसाट हिला सायबर शिक्षा पुरस्कार २०२५ सर्वोत्कृष्ट सचिव पुरस्काराने गौरवण्यात आले.



ग्रंथालय विभागातर्फे महत्त्वाचे राष्ट्रीय दिवस, राष्ट्रीय थोर पुरुष व महिलांच्या जयंती व पुण्यतिथी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून, त्यांच्यावरील माहितीचे व पुस्तकांचे प्रदर्शन भरवून आणि त्यांच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेऊन साजरे करण्यात येतात. दिनांक ०६.१२.२०२४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुण्यतिथी (महापरीनिर्वाण दिन), दिनांक २१.१२.२०२४ रोजी श्रीनिवास रामानुजन जयंती, दिनांक २७.१२.२०२४ रोजी डॉ. भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख जयंती, दिनांक ०३.०१.२०२५ रोजी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले जयंती महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागामध्ये साजरी करण्यात आली. गणित विभाग प्रमुख डॉ. वानखेडे यांनी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. तसेच, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्यावरील माहितीचे तसेच पुस्तक प्रदर्शन करण्यात आले होते. डॉ. वानखेडे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावरील माहितीचे अतिशय सुंदर शब्दात वर्णन केले.

दिनांक १२.०१.२०२५ रोजी जिजाऊ मासाहेब जयंती तसेच स्वामी विवेकानंद जयंती, दिनांक २३.०१.२०२५ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती तसेच बाळासाहेब ठाकरे जयंती ग्रंथालय विभागामध्ये साजरी करण्यात आली. दिनांक ३०.०१.२०२५ रोजी महात्मा गांधी पुण्यतिथी निमित्त महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. तसेच महात्मा गांधी यांच्यावरील माहितीचे तसेच पुस्तक प्रदर्शन करण्यात आले.



**वाचन संकल्प महाराष्ट्राचा अहवाल**

वाचन संस्कृती समृद्ध करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाच्या वाचन संकल्प महाराष्ट्राचा या मोहिमेअंतर्गत विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालय, ठाणे येथे दिनांक १ जानेवारी ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रम अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विविध वाचन प्रोत्साहन उपक्रमांच्या अंमलबजावणीवर देखरेख करण्यासाठी शासनाने दिलेल्या सूचनेनुसार महाविद्यालयाने एक वाचन संकल्प समिती स्थापन केली. वाचन संकल्प समिती, भाषा विभाग आणि केंद्रीय ग्रंथालय यांच्यातील धोरणात्मक सहकार्यातून हा उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आला.

**वाचन संकल्प पंधरवड्यादरम्यान आयोजित उपक्रम:**

१. **सामूहिक वाचन –** दिनांक १ जानेवारी २०२५ रोजी ग्रंथालयात सामूहिक वाचन उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी प्रभारी प्राचार्या डॉ. विंदा मांजरामकर यांनी वाचनाचे महत्त्व सांगितले. त्यानंतर ग्रंथपाल कादंबरी मांजरेकर यांनी वाचन अभिरुची विकसित कशी करता येईल याबद्दल मार्गदर्शन केले. त्यानंतर ७० विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर सहकाऱ्यांनी सामूहिक वाचन केले. तसेच १ ते ३ जानेवारी २०२५ दरम्यान महाविद्यालयाच्या विविध विभागात सामूहिक वाचन उपक्रम राबविण्यात आला.

२. **ग्रंथ दिंडी कार्यक्रम :** ४ जानेवारी २०२५ रोजी, ग्रंथ दिंडी ही पारंपरिक मिरवणूक म्हणून आयोजित करण्यात आली होती ज्याचा उद्देश साहित्यिक संस्कृतीचा उत्सव साजरा करणे आणि त्याचा प्रचार करणे होता. या कार्यक्रमात ९० हून अधिक विद्यार्थी आणि कर्मचारी सहभागी झाले होते, ज्यांनी महाविद्यालयीन परिसर

आणि त्याच्या आसपासच्या परिसरातून जाणाऱ्या मार्गात सक्रियपणे भाग घेतला. सहभागी विद्यार्थ्यांनी समर्थ रामदास स्वामींचे मनाचे श्लोक याचे वाचन या दिंडीच्या माध्यमातून केले.या मिरवणुकीत धोरणात्मकरीत्या आयोजित पुस्तक प्रदर्शने आणि वाचन जागरूकता घोषणांचा समावेश होता, वाचनाचे महत्त्व अधोरेखित करणारे सांस्कृतिक घटक प्रभावीपणे एकत्रित केले. या उपक्रमाने समाजातील साहित्यिक संस्कृतीची दृश्यमानता लक्षणीयरीत्या वाढवली. या कार्यक्रमाद्वारे साहित्यिक कामांमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहन देणारे आणि त्यांच्या सांस्कृतिक महत्त्वाची सामूहिक समज वाढवणारे वातावरण यशस्वीरीत्या तयार केले.

३. **पुस्तक प्रदर्शन:** केंद्रीय ग्रंथालयाने १ जानेवारी ते १५ जानेवारी २०२५ या १५ दिवसांच्या कालावधीत १५ विविध विषयांवर ग्रंथालयात पुस्तक प्रदर्शन आयोजित केले होते, ज्यामध्ये काळजीपूर्वक निवडलेल्या प्रेरक आणि प्रेरणादायी साहित्याचे प्रदर्शन केले गेले होते. या प्रदर्शनात मराठी आणि इंग्रजी दोन्ही भाषेतील विविध कलाकृतींचा संग्रह होता, ज्यामध्ये स्वयं-मदत, चरित्र आणि उल्लेखनीय व्यक्तींचे आत्मचरित्र यांचा समावेश होता, ज्यामध्ये महाराष्ट्राशी संबंधित व्यक्तींवर विशेष भर होता. या कार्यक्रमात ४८७ विद्यार्थी आणि कर्मचारी यांनी उत्स्फूर्तपणे आपला सहभाग नोंदवला. या प्रदर्शनामुळे विद्यार्थी आणि कर्मचारी वर्गाची विविध साहित्य संपदेची ओळख पुन्हा नव्याने झाली, उपलब्ध वाचन साहित्याच्या श्रेणीबद्दल जागरूकता निर्माण झाली आणि विद्यार्थ्यांमध्ये विविध वाचनाची आवड निर्माण होण्यास मोलाची मदत झाली.

४. **साहित्यिक स्पर्धा :**

अ. **अभिवाचन स्पर्धा –** ११ जानेवारी २०२५ रोजी सांख्यिकी विभागातर्फे पुस्तक अभिवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत ३९ विद्यार्थ्यांचा सहभाग आहे. या स्पर्धेचे मूल्यांकन वाचन आणि उच्चारांची स्पष्टता, अभिव्यक्ती, प्रभावी वेळेचे व्यवस्थापन आणि सादर केलेल्या सामग्रीची व्यापक समज या निकषांवर करण्यात आले. जोशी बेडेकर कला आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. विमुक्ता राजे या स्पर्धेच्या परीक्षक होत्या.

ब. **पुस्तक परीक्षण स्पर्धा –** वैयक्तिक विभाग पातळीवर पुस्तक परीक्षण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती आणि या स्पर्धेत ११६ विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. सहभागींनी निवडलेल्या पुस्तकाचे लेखी पुनरावलोकन तयार केले, ज्यात टीकात्मक विश्लेषण, साहित्यिक घटक आणि वैयक्तिक प्रतिबिंबे यावर लक्ष केंद्रित केले गेले. मूल्यांकनांमध्ये विश्लेषणाची खोली, सादरीकरणाची स्पष्टता, साहित्यिक घटकांची समज आणि मौलिकता यांचा विचार केला गेला. पुस्तक परीक्षण स्पर्धेमध्ये विजेत्या १७ विद्यार्थ्यांना प्रशस्ती पत्रक आणि पुस्तकरूपी भेट देऊन २५ जानेवारी २०२५ रोजी गौरविण्यात आले.



५. **लेखक तुमच्या भेटीला :** वाचन संकल्प महाराष्ट्राचा या अभियानांतर्गत महाविद्यालयाच्या पतंजली सभागृहात ग्रंथालय विभाग व मराठी भाषा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'लेखक तुमच्या भेटीला' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी उल्हासनगर कोकण मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्रा. डॉ. प्रकाश माळी प्रमुख पाहुणे म्हणून

उपस्थित होते. त्यांनी आपल्या कविता व स्वलिखित चार पुस्तकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाचन संस्कृती जोपासण्याचे महत्त्व पटवून दिले आणि वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी प्रेरित केले.

एकूण ७७३ विद्यार्थी आणि कर्मचारी वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमात सक्रियपणे सहभागी झाले होते. ग्रंथ दिंडी मधील सहभागामुळे विद्यार्थी वर्गाची मराठी संस्कृतीबद्दलची ओढ प्रकर्षाने जाणवली. पुस्तक प्रदर्शनाला ४८७ विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांची उल्लेखनीय उपस्थिती होती. एकूण १५५ विद्यार्थ्यांनी पुस्तक परीक्षण आणि पुस्तक अभिवाचन स्पर्धेत भाग घेतला, ज्यामुळे त्यांचा उत्साह आणि साहित्यिक उत्कृष्टतेबद्दलची वचनबद्धता अधोरेखित झाली. लेखक प्रा. डॉ. प्रकाश माळी यांनी आपल्या कविता व पुस्तकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाचन संस्कृती जोपासण्याचे महत्त्व पटवून दिले. पुस्तक परीक्षण स्पर्धेमध्ये विजेत्या १७ विद्यार्थ्यांना प्रशस्ती पत्रक आणि पुस्तकरूपी भेट देऊन २५ जानेवारी २०२५ रोजी गौरविण्यात आले.



**विद्या प्रसारक मंडळाचे**
**ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय**

३ डिसेंबर रोजी डॉ. श्रीविद्या जयकुमार यांना फौजदारी कायद्यातील अलीकडच्या सुधारणा : महिलांसाठी कायदेशीर संरक्षण वाढवणे या विषयावर भाषण देण्यासाठी मुंबईतील के.ई.टी. वझे कॉलेजच्या महिला विकास समिती आणि व्यवसाय कायदा विभागाने आमंत्रित केले होते.




१ जानेवारी – हिवाळी सुट्टी नंतर दुसऱ्या सत्राची सुरुवात दिनांक १ जानेवारी पासून झाली सत्र III व सत्र VI च्या विद्यार्थ्यांचे ओरीएंटेशन घेण्यात आले.

**रिअल इस्टेट कायद्यातील प्रमाणपत्र कोर्सच्या लेखी परीक्षा, वायवा आणि मूट परीक्षा दिनांक ३ व ४ जानेवारी रोजी घेण्यात आली.**

**दिनांक ७ जानेवारी रोजी सेमिस्टर २ आणि ४ चा पुनर्मूल्यांकन निकाल जाहीर करण्यात आला.**

**सत्र १ –** प्रथम वर्ष विधीच्या विद्यार्थ्यांसाठी दिनांक ११,१३,१४ जानेवारी रोजी मराठी लेक्चर घेण्यात आले. तसेच त्याच्या सराव परीक्षा दिनांक १६, १७ जानेवारी रोजी घेण्यात आल्या.

**दिनांक ७ जानेवारी रोजी द्वितीय वर्ष विधी च्या ४ सत्र च्या विद्यार्थ्यांसाठी इलेक्शन कायदा ह्या प्रमाणपत्र अभ्यासक्रम सर्टिफिकेट कोर्सचे उद्‌घाटन करण्यात आले.**

दिनांक ११ जानेवारी रोजी प्रभारी प्राचार्या डॉ.श्रीविद्या जयाकुमार ह्यांनी मेनन महाविद्यालय भांडूप येथे कॉर्पोरेट कायद्यातील उदयोन्मुख ट्रेन्डस ट्रेन या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग घेऊन 'इमर्जिंग एम्बेडेड इन्सुरन्स : ए क्रीटीक्‍यु ऑफ द इन्सुरन्स ऑफर बाय रेल्वे' ह्या विषयावर आपला संशोधन पेपर सादर केला.

**११ जानेवारी पासून प्रथम वर्ष विधी च्या विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रक्रीये वेळी घेतलेली मूळकागदपत्रे परत देण्यास सुरुवात झाली. वि.प्र.म.च्या टीएमसी लॉ कॉलेजतर्फे राज्य क्रीडा दिन – १५ जानेवारी २०२५ रोजी आयोजन**

वि.प.म.च्या टीएमसी लॉ कॉलेज, ठाणे यांच्या वतीने राज्य क्रीडा दिनानिमित्त श्री. खाशाबा जाधव बॉक्स क्रिकेट स्पर्धा आणि नॉकआउट बुद्धिबळ स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या क्रीडा महोत्सवात क्रीडापटूंच्या उत्कृष्ट खेळभावनेचा सन्मान करण्यात आला आणि वि.प.म. संस्थेच्या विविध महाविद्यालयांमधील सहभागी विद्यार्थी एकत्र आले, ज्यामध्ये BRIMS मॅनेजमेंट इन्स्टिटयूट, वि.प.म. इंजिनीअरिंग आणि पॉलिटेक्निक कॉलेज, जोशी बेडेकर महाविद्यालय आणि यजमान संस्था टीएमसी लॉ कॉलेज यांचा समावेश होता.

उद्घाटन समारंभ : कार्यक्रमाची सुरुवात एक भव्य उद्घाटन समारंभाने झाली, ज्याचे अध्यक्षस्थान वि.प.म. इंजिनीअरिंग आणि पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य श्री. नायक आणि टीएमसी लॉ कॉलेजच्या प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी भूषवले. प्राचार्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना क्रीडाशिस्त, संघभावना आणि चिकाटीचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले. सर्व खेळाडूंना क्रीडानैतिक शपथ दिली गेली, ज्यामुळे खेळातील प्रामाणिकपणा आणि स्पर्धेतील सद्भावना अधिक दृढ झाली.

बॉक्स क्रिकेट स्पर्धा : या दिवसातील मुख्य आकर्षण म्हणजे बॉक्स क्रिकेट स्पर्धा, जिथे उत्कंठावर्धक सामने रंगले. सर्व सहभागी संघांनी उत्कृष्ट खेळाचा प्रत्यय दिला. तगड्या स्पर्धेनंतर खालील विजेते घोषित करण्यात आले –

प्रथम पारितोषिक – BRIMS मॅनेजमेंट इन्स्टिटयूट

द्वितीय पारितोषिक – जोशी बेडेकर महाविद्यालय

नॉकआउट बुद्धिबळ स्पर्धा – बुद्धिबळ स्पर्धेमध्ये सहभागी खेळाडूंची बौद्धिक कौशल्ये आणि रणनीती कौशल्यांचा प्रभावी आविष्कार पहायला मिळाला. या स्पर्धेत जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सर्वोत्तम कामगिरी करत सर्वच प्रमुख पारितोषिके जिंकली. विजेत्यांची नावे खालीलप्रमाणे :

१. प्रथम पारितोषिक – ध्रुव मुंथे

२. द्वितीय पारितोषिक – दिपांकर यादव

३. तृतीय पारितोषिक – प्रवीण पटेल

बुद्धिबळ सामन्यांमध्ये स्पर्धकांच्या सूक्ष्म विचारशक्ती आणि एकाग्रतेचे उत्कृष्ट प्रदर्शन पाहायला मिळाले, ज्यामुळे हा उपक्रम संस्मरणीय ठरला. पारितोषिक वितरण समारंभात महत्त्वाचे मान्यवर उपस्थित होते:

डॉ. नीतिन जोशी – BRIMS मॅनेजमेंट इन्स्टिटयूटचे प्राचार्य

श्री. नायक – वि.प.म. इंजिनीअरिंग आणि पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य

डॉ. श्रीविद्या जयकुमार – टीएमसी लॉ कॉलेजच्या प्राचार्या

सन्माननीय मान्यवरांनी विजेत्यांना पुरस्कार प्रदान करून सर्व स्पर्धकांचे आणि आयोजकांचे कौतुक केले आणि विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच क्रीडा आणि सहशैक्षणिक उपक्रमांमध्येही यश संपादन करण्यासाठी प्रेरित केले.

आयोजक मंडळ आणि स्वयंसेवकांचा योगदान : या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनामागे वि.प.म.च्या टीएमसी लॉ कॉलेजच्या आयोजक टीमचे मोठे योगदान होते. सहायक प्राध्यापक विनोद वाघ, डॉ. रुपाली जामोडे आणि प्रा. प्रेरणा वसावे यांनी कार्यक्रमाच्या उत्कृष्ट नियोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

टीएमसी लॉ कॉलेजच्या स्वयंसेवकांनी स्पर्धेचे सुयोग्य नियोजन, स्पर्धकांचे समन्वय आणि संपूर्ण कार्यक्रमाचे व्यवस्थापन यामध्ये मोलाची भूमिका बजावली.

आभार प्रदर्शन : कार्यक्रमाचा समारोप सहाय्यक प्राध्यापक यतिन पंडित यांच्या आभार प्रदर्शनाने झाला. त्यांनी सर्व मान्यवरांचे, प्राध्यापकांचे, सहभागी खेळाडूंचे आणि स्वयंसेवकांचे मनःपूर्वक आभार मानले आणि कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामधील त्यांचे योगदान अधोरेखित केले. या भव्य क्रीडा स्पर्धेने विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाभाव, संघभावना आणि सकारात्मक स्पर्धात्मकता निर्माण करण्यास महत्त्वाची भूमिका बजावली.




महाविद्यालयाने AISHE संदर्भात आपली माहिती दिनांक १३ जानेवारी रोजी सादर केली. आणि राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाणन परिषद NAAC करिता वार्षिक गुणवत्ता हमी अहवाल AQIR दिनांक १४ जानेवारी रोजी सादर केला.

**१ जानेवारी २०२५ ते १५ जानेवारी २०२५ वाचन संकल्प महाराष्ट्राचा**

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र कर. संकीर्ण २०२४/ई-९०५२२१ (परिपत्रक संलग्न) समन्वय दिनांक २० डिसेंबर २०२४ नुसार विद्या प्रसारक मंडळाच्या ठा.म.पा. विधी महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा त्या दिनांक १ जानेवारी ते १५ जानेवारी पर्यंत साजरा करण्यात आला.

उपक्रमांतर्गत सामूहिक वाचन, लेखक विद्यार्थी परिसंवाद, ग्रंथ प्रदर्शन, ग्रंथालय स्वच्छता, ग्रंथ दिंडी पुस्तक परीक्षण इत्यादींचा समावेश आहे. २८ डिसेंबर रोजी ग्रंथालयाची स्वच्छता करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. १ जानेवारी २०२५ ला विद्यार्थी सामूहिक वाचनात सहभागी झाले. त्या वेळी सुमारे १०० ते १२० पुस्तकांचे वाचन करण्यात आले. ३ जानेवारी ते ११ जानेवारी पर्यंत विविध विषयांवर पुस्तक प्रदर्शन ठेवण्यात आले होते. ३ जानेवारी रोजी ठाण्यातील लेखक अनंत गद्रे ह्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला वाचनाचे महत्त्व सांगत आपले विचार व्यक्त करण्यासाठी लेखन करण्याचा देखील त्यांनी सल्ला दिला. १० जानेवारी रोजी ग्रंथ दिंडीचे आयोजन करण्यात आले. पारंपरिक वेशभूषेत विद्यार्थी सहभागी झाले होते. ११ जानेवारी रोजी पुस्तक परीक्षण लेखन व कथन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. विभागीय सहसंचालक ह्यांची १४ जानेवारी रोजी झालेल्या मीटिंग नंतर पुस्तक परीक्षण लेखनाची मुदत २१ जानेवारी पर्यत वाढवण्यात आली. त्याचे पारितोषिक वितरण २६ जानेवारी रोजी पार पडले. प्रभारी प्राचार्या डॉ श्रीविद्या जयकुमार ह्यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथपाल शीतल सोनावणे ह्यांनी हा उपक्रम पार पडला महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक प्रेरणा वसावे ह्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

| दिनांक | कार्यक्रम | उपक्रमात सहभागी विद्यार्थी |
|---|---|---|
| २८ डिसेंबर २०२४ | ग्रंथालय स्वच्छता | १० |
| १ जानेवारी २०२५ | वाचन कौशल्य कार्यशाळा सामूहिक वाचन | १२० |
| ३ जानेवारी | लेखक विद्यार्थी परिसंवाद | ३०-४० |
| ३ ते ९ जानेवारी | ग्रंथ प्रदर्शन (Book Exhibition) | १५० |

| | | |
|---|---|---|
| १० जानेवारी | ग्रंथ दिंडी | ५० |
| ११ जानेवारी | पुस्तक परीक्षण स्पर्धा | ७४ विद्यार्थी व ४ शिक्षक |




१९ जानेवारी २०२५ – मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे ह्यांच्या द्वारे करिअर कट्टा अंतर्गत विधी व न्याय क्षेत्रातील सुप्रसिद्ध कायदेतज्ज्ञ पद्मश्री मा. उज्ज्वल निकम ह्यांचे व्याख्यान १९ जानेवारी रोजी आयोजित केले होते. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या ह्यांनी ५२ विद्यार्थ्यांच्या समवेत सदर व्याख्यानास उपस्थित होत्या.

दिनांक २० जानेवारी रोजी सत्र ४ व रिअल इस्टेट कायद्यातील प्रमाणपत्र कोर्स ह्या परीक्षांचा निकाल घोषित करण्यात आला.

दिनांक २१ जानेवारी रोजी नवीन रुजू झालेल्या ६ सहा. प्राध्यापकांचे मान्यता पत्र (अँप्रोवल लेटर) विद्यापीठ कडून प्राप्त झाले. सहा. प्राध्यापकांची नावे पुढील प्रमाणे : सहा. प्राध्यापक रुपाली जमोडे, सहा. प्राध्यापक चांदणी घोगारे, सहा. प्राध्यापक शिवाजी बिबे, सहा. प्राध्यापक मनोजकुमार नाईक, सहा. प्राध्यापक प्रेरणा वसावे, सहा. प्राध्यापक यतीन पंडित.

WDC/ICC अंतर्गत दिनांक २४.१.२०२५ रोजी बालिका दिवस साजरा करण्यात आला. सूत्रसंचालन सहा. प्राध्यापक चंदनी घोगरे यांनी केले. राष्ट्रीय बालिका दिवस साजरा करण्याची सुरुवात भारतात २००८ पासून झाली असून, देशाची पहिली बालिका देशाची पंतप्रधान २४ जानेवारी १९६६ साली झाल्या तो दिवस 'बालिका दिवस' म्हणून साजरा केला जातो. हा कार्यक्रम साजरा करण्याचा उद्देश व महत्त्व सांगून या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

याप्रसंगी प्रास्ताविक डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी केले. बालिका दिनाच्या या खास प्रसंगी मुलींच्या सशक्तीकरण आणि समानतेच्या मार्गावर प्रगतीसाठी विविध बाबींवर चर्चा करणे आवश्यक आहे. बालिका सशक्तीकरणाचे महत्त्व जाणून घेऊन त्या पद्धतीने समाजात परिवर्तन होणे आवश्यक आहे. असे त्यांनी सांगितले.

सहयोगी प्राध्यापक डॉ. रुपाली यांनी मुलींच्या कार्यक्षेत्रातील व योगदानातील विकासावर प्रकाश टाकला आणि समानतेच्या दिशेने मुलींनी पुढे यशस्वीपणे वाटचाल करत राहावी असे सांगितले.

**विद्यार्थी सहभाग –** विद्यार्थिनी ज्ञानेश्वरी शिंदे आणि आरती अंकुश यांनी मुलींच्या समाजातील योगदानावर आधारित प्रेरणादायी भाषण दिले. यात आनंदीबाई जोशी यांच्या पहिली महिला डॉक्टर होण्याचा प्रवास यावर भाष्य करण्यात आले.

**उत्स्फूर्त प्रतिसाद –**

प्रसंगी विद्यार्थ्याने महिला सक्षमीकरणासाठी वैयक्तिक, तसेच सामूहिक गायन केले.

सहायक प्राध्यापक शिवाजी बिबे यांनी प्रिन्सिपॉल

सर्व उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थी-विद्यार्थीनी यांचे आभार प्रदर्शन केले. सदर कार्यक्रमास सहा.प्रा. विनोद वाघ सर, सहा. प्रा. यतीन पंडित, डॉ. रुपाली जामोडे, सहा. प्रा.कृष्णा कामत, सहा. प्रा. मनोज नाईक, सहा. प्रा. शिवाजी बिबे व सहा. प्रा. सहा. प्रा. प्रेरणा वसावे व विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते.



## मराठी वाङ्मय मंडळाकडून मराठी कवितावाचन स्पर्धेचे आयोजन

विद्या प्रसारक मंडळाच्या टी.एम.सी. विधी महाविद्यालयातील मराठी वाङ्मय मंडळाकडून दिनांक २९ जानेवारी २०२५ रोजी स्व-लिखित मराठी कविता वाचन स्पर्धेचे आयोजन केले होते. सदर कार्यक्रमची सुरुवात महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांच्या प्रस्तावनेतून झाली. मराठी वाङ्मय विभाग प्रमुख प्रा. यतीन पंडित यांनी काव्य-वाचन स्पर्धेचे नियम सांगितले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शिवाजी बिबे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रा. शिशिर आंगने यांनी 'मराठी भाषा आणि अभिजात दर्जा' या विषयावर विचार मांडले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. कृष्णा कामत व डॉ. रुपाली जामोडे यांनी काम पहिले. प्रा. विनोद वाघ यांनीही या निमित्ताने एक कविता सादर केली. या स्पर्धेमध्ये १) रामा निजसुरे २) शर्मिला तोडकर ३) वैष्णवी वाघ आणि विवेक पाटील हे विजेते ठरले. सदर कार्यक्रमासाठी विधी महाविद्यालयतील सर्व शिक्षक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. सदर कार्यक्रमचे आभार सहा. प्रा. प्रेरणा वसावे यांनी मानले.



**ANGC शिष्यवृत्ती –** गैरसरकारी महाविद्यालयांची संघटना, मुंबई ह्यांच्या द्वारे देण्यात येणारी शिष्यवृत्ती महाविद्यायातील प्रथम वर्ष विधीचे दोन विद्यार्थी स्वप्नील संतोष श्रावणे आणि अनिता कलाप्पा सूर्यवंशी ह्यांना प्राप्त झाली.

## व्ही.पी.एम. टिएमसी विधी महाविद्यालयात एलएलएम च्या अभ्यासक्रमाचे उद्घाटन संपन्न



विद्या प्रसारक मंडळाचे टिएमसी विधी महाविद्यालयात विधी पदव्युत्तर अभ्यासक्रम म्हणजेच एलएलएम या पदवी अभ्यासक्रमाचे उद्घाटन ३१ जानेवारी

रोजी पार पडले. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, जीएसटी आयुक्त चंद्रशेखर मिश्रा यांच्या हस्ते हे उद्घाटन करण्यात आले. श्री. रवींद्र रसाळ, प्रबंधक, विद्या प्रसारक मंडळ हेही उपस्थित होते. महाराष्ट्र शासन व मुंबई विद्यापीठाने महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून विधी पदव्युत्तर अभ्यासक्रम घेण्यासाठी परवानगी दिली होती. यावेळी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयाकुमार यांनी सांगितले की, महाविद्यालय संविधान व प्रशासकीय कायदे आणि व्यावसायिक कायदे अशा दोन विषयांमध्ये विधी पदव्युत्तर अभ्यासक्रम घेणार आहे. पहिल्याच वर्षी अपेक्षेप्रमाणे प्रतिसाद महाविद्यालयास मिळालेला आहे. ठाणे शहरातील सर्वांत जुने व मोठे असलेल्या या महाविद्यालयात विधी पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू झाल्यामुळे आता मुंबईकडे धावण्याची आवश्यकता नसल्याचे त्यांनी सांगितले. सध्या महाविद्यालयात विधी पदवी एलएलबीचे एकूण ७५० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यावेळी प्राध्यापक व विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. यावेळी श्री मिश्रा यांनी विधीच्या विद्यार्थ्यांना जीएसटी श्रेत्रात वकिली करण्याचे आवाहन केले. जीएसटी कायद्याची व्याख्या, त्याचे विविध पैलू व त्यांची अंमलबजावणी बद्दल यावेळी माहीती दिली. श्री. रवींद्र रसाळ यांनी देखील यावेळी प्रत्यक्ष कर व अप्रत्यक्ष कर यांच्या संबंधातील काही प्रश्नावर चर्चा केली.




## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

व्ही.पी.एम. पॉलिटेक्निक, ठाणे या संस्थेमधून 'ॲडवान्सड डिप्लोमा इन इंडस्ट्रियल सेफ्टी' हा कोर्स उत्तीर्ण झालेल्या आमच्या माजी विद्यार्थिनी सौ. रेश्मा विनायक कदम यांना 'वर्कस्पेस सेफ्टी मॅनेजर ऑफ द इयर - फीमेल पुरस्कार' Occupational Safety and Health (OSH INDIA Awards 2024) तर्फे नोव्हेंबर २०२४ मध्ये प्रदान करण्यात आला.




सौ. रेश्मा विनायक कदम यांना त्यांच्या असामान्य कामगिरीबद्दल आणि सर्व महत्त्वाकांक्षी सुरक्षा नेत्यांसाठी प्रेरणास्थान बनल्याबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. त्या आणखी उंच शिखरावर जात राहो हीच सदिच्छा.

तृतीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनीअरिंग (पॉलीटेक्निक) विभागातील आदित्य देशमुख, अनिकेत भोर, विश्रुती जाधव, जिज्ञेश बोरसे या विद्यार्थ्यांनी 'Hackathon (CODECRATZ)' राज्यस्तरीय स्पर्धेत प्रथम पारितोषिक संपादन केले. सदर स्पर्धा दि. १७/१/२५ व १८/१/२५ रोजी फादर ॲग्नेल पॉलिटेक्निक (वाशी) येथे आयोजित केली होती. विद्यार्थ्यांना सन्मानपत्र व १०,०००/- रु.चे पारितोषिक मिळाले.



**‘ वाचनसंकल्प महाराष्ट्राचा ‘ या अभिनव उपक्रमांतर्गत पुस्तक परीक्षण स्पर्धा**

विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतन आणि अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ग्रंथालय आणि माहिती केंद्राद्वारे वाचन संकल्प महाराष्ट्राचा या अभिनव उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी पुस्तक परीक्षण स्पर्धा दिनांक १५ जानेवारी २०२५ रोजी ग्रंथालयातील वाचन कक्ष येथे सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत घेण्यात आली. विद्यार्थ्यानी ग्रंथालयातील आवडत्या पुस्तकाची निवड करून त्या पुस्तकाचे परीक्षण करावयाचे होते. सदर स्पर्धेकरिता तंत्रनिकेतन आणि अभियांत्रिकी या दोन्ही महाविद्यालयातील जवळ - जवळ १३० हून अधिक विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला होता.

सदर स्पर्धेत विजेते झालेले विद्यार्थी खालील प्रमाणे :-

**द्वितीय वर्ष पदविका विद्यार्थी**

| अनु. क्रमांक | विद्यार्थ्यांचे नाव | वर्षे/ कोर्स | श्रेणी |
|---|---|---|---|
| १. | भावेश राजू अडेपवार | SYIS | प्रथम |
| २. | रिद्धी पी. कोंडलेकर | SYIF | द्वितीय |
| ३. | अमेय सुजित सांगरे | SYEP | तृतीय |
| ४. | अमृता व्ही. पाटील | SYCO | प्रथम उत्तेजनार्थ |
| ५. | प्रसन्ना दलभंजन | SYIE | द्वितीय उत्तेजनार्थ |

**तृतीय वर्ष पदविका विद्यार्थी**

| अनु. क्रमांक | विद्यार्थ्यांचे नाव | वर्षे/ कोर्स | श्रेणी |
|---|---|---|---|
| १. | स्वयम आर. गोरिला | TYIS | प्रथम |
| २. | आयुश्री रोहन मनीषा दळवी | TYIF | द्वितीय |
| ३. | पार्थ रवींद्र रोकडे | TYEP | तृतीय |
| ४. | विश्रुती जाधव | TYCO | प्रथम उत्तेजनार्थ |
| ५. | दिक्षा सुतार | TYIE | द्वितीय उत्तेजनार्थ |

**प्रथम वर्ष पदवी विद्यार्थी**

| अनु. क्रमांक | विद्यार्थ्यांचे नाव | वर्षे/ कोर्स | श्रेणी |
|---|---|---|---|
| १. | इशिता राजेश पांचाल | FYBE - AR | प्रथम |
| २. | रुची गोविंद सांगवेकर | FYBE - IT | द्वितीय |
| ३. | प्रियांका महादेव लाड | FYBE - EE | तृतीय |
| ४. | इशिता संदीप राऊत | FYBE - AR | उत्तेजनार्थ |

---

तारुण्याचा काळ हा अतिरिक्त जीवनाचा सहाय्यक असतो.

स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा ग्रंथ भेट देऊन सत्कार करण्यात आला. सदर स्पर्धा आयोजनामागचा प्रमुख उद्देश असा की, विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी. वाचनामुळे भावविश्व आणि अनुभवविश्व विस्तारते. शिवाय ज्ञान प्रसारण आणि चांगला वाचक घडविण्यासाठी ग्रंथालयाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे अशा स्पर्धांमुळे वाचक आणि पुस्तक याच अतूट नात निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. ही स्पर्धा यशस्वी होण्यासाठी डॉ. गीताली इंगवले, श्री. चंद्रकांत शिंगाडे आणि सौ. प्रज्ञा दळवी यांनी प्रयत्न केले.



स्पर्धेत सहभागी झालेले विद्यार्थी आणि बक्षीस वितरण

**'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' निमित्ताने-काव्यवाचन**

वि. प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतन आणि अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ग्रंथालय आणि माहिती केंद्रातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवडा हा काव्य वाचनाने साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रम ग्रंथालय आणि माहिती केंद्रातील वाचन कक्ष येथे दिनांक २७.०१.२०२५ रोजी ११.०० ते १२.०० या वेळेत पार पडला. सुरुवातीला ग्रंथालय सहाय्यक श्री. चंद्रकांत शिंगाडे यांनी 'मराठी भाषासंवर्धन पंधरवडा' विषयीचे महत्त्व विषद केले. त्यांनी 'माझे विद्यापीठ' कवी नारायण सुर्वे यांच्या काव्यसंग्रहातील 'एक आम्ही असे निघालो' व रानकवी ना. धों. महानोर यांची 'या नभाने या भुईला दान द्यावे' ह्या कविता वाचून दाखविल्या. प्रसंगी प्रा. जय सुर्वे यांनी वि. दा. सावरकर यांची 'सागरा प्राण तळमळला' ही अजरामर कविता गायली. तंत्रनिकेतन आणि अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आप-आपल्या आवडीच्या कविता वाचून दाखविल्या. सदर काव्य वाचनात कवी मंगेश पाडगावकर, रानकवींना. धों. महानोर, कामगार कवी नारायण सुर्वे, मुरलीधर नारायण गुप्ते, गुरु ठाकूर आणि संकर्ष कराडे इत्यादी कवींच्या कविता विद्यार्थ्यांनी सादर केल्या.



सदर कार्यक्रम आयोजनामागचा प्रमुख उद्देश असा की, मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार व्हावा हा आहे. ह्याच धोरणास अनुसरून दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा वि. प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतन आणि अभियांत्रिकी महाविद्यालय ठाणे येथील ग्रंथालय आणि माहिती केंद्राद्वारे काव्य वाचन कार्यक्रम घेण्यात आला. महाराष्ट्र राज्याची राज्यभाषा ही मराठी आहे. मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त व्हावा आणि मराठी भाषेचे संवर्धन व्हावे या हेतूने दर वर्षी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीत साजरा करण्यात येतो.



सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ. गीताली इंगवले ग्रंथालय सहाय्यक श्री. चंद्रकांत शिंगाडे, प्रा. जय सुर्वे, सौ. प्रज्ञा दळवी इत्यादींचे सहकार्य लाभले.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

२ जानेवारी २०२५ : डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी लिहिलेली 'नेव्हिगेटिंग कॉम्प्लेक्सिटी : अ मॅनेजरियल पर्स्पेक्टिव्ह ऑन इंडियन रेल्वे या शीर्षकाची केस स्टडी' एम्स जर्नल ऑफ मॅनेजमेंटच्या खंड १० मध्ये प्रकाशित झाली.

डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी आयक्यूएसी आणि फॅकल्टी अँड स्टाफ डेव्हलपमेंट कमिटीजच्या वतीने प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांसाठी श्री. रामदास शेणॉय यांचे एक 'हॅपीनेस वर्कशॉप' आयोजित केले.



८ जानेवारी २०२५ : विवेकानंद मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटचे नियतकालिक 'इंटरनॅशनल जर्नल ऑफ फ्रंटियर टेक्नॉलॉजी अँड बिझनेस' (IJFTB) च्या सल्लागार मंडळावर डॉ. स्मिता जपे यांची नियुक्ती करण्यात आली.

१३ जानेवारी २०२५ : ब्रिम्सच्या वतीने डॉ. स्मिता जपे यांना तेलवणे पॉवर इक्विपमेंट्स प्रायव्हेट लिमिटेड तर्फे त्यांच्या ७ प्रकल्पां संदर्भात तज्ज्ञ सल्ला सेवेसाठी आमंत्रित करण्यात आले.

१५ जानेवारी २०२५ : एमएमएस २०२४-२६ तुकडीचा प्रथम वर्षाचा विद्यार्थी श्री. प्रतीक यादव आणि त्याच्या संघाने साकेत ज्ञानपीठ, कल्याण (पूर्व) तर्फे आयोजित इंटर-कॉलेजिएट फेस्ट मॅग्रोस्टाव रोहक २०२५ मध्ये बॉक्स क्रिकेट स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला व शार्क टँक स्पर्धेत यश तेंडोलकर आणि अवनीश प्रजापती यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. तर अभिषेक चव्हाण आणि सुबोध दळवी यांनी बॅडमिंटन दुहेरी स्पर्धेत द्वितीय पारितोषिक जिंकले.

तसेच एमएमएस २०२३-२५ तुकडीच्या दुसऱ्या वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या संघाने ठाणे येथील व्हीपीएमच्या टीएमसी लॉ कॉलेजने आयोजित केलेल्या इंटर-कॉलेजिएट (व्हीपीएम) बॉक्स क्रिकेट स्पर्धेत विजय मिळवला.



१५ जानेवारी २०२५ : डॉ. व्ही.एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे सहाय्यक प्राध्यापक कृष्णकांत लासुणे यांनी प्रतिष्ठित अशा १७ व्या अविष्कार महाराष्ट्र राज्य आंतर-विद्यापीठ संशोधन परिषदेत सुवर्णपदक जिंकून उल्लेखनीय कामगिरी केली. १२ ते १५ जानेवारी २०२५ दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी, विद्याविहार, लोणेरे, रायगड, महाराष्ट्र येथे आयोजित या कार्यक्रमात राज्यभरातील २० हून अधिक विद्यापीठांचा सहभाग होता.

'आरोग्यसंकलनम' या विषयावरील श्री. लासुने यांच्या संशोधनाला आरोग्यसेवा व्यवस्थापन क्षेत्रातील समकालीन आव्हानांना तोंड देण्यासाठी त्याच्या सखोल, नाविन्यपूर्ण, आणि प्रासंगिकतेसाठी व्यापक प्रशंसा मिळाली. त्यांचे उत्कृष्ट सादरीकरण आणि संशोधन उत्कृष्टता स्पर्धात्मक क्षेत्रातील विद्वानांमध्ये ठळकपणे दिसून आली.






महाराष्ट्र सरकारचा उपक्रम असलेल्या अविष्कार संशोधन परिषदेचे उद्दिष्ट विद्यार्थी आणि शिक्षणतज्ज्ञांमध्ये नावीन्यपूर्णता आणि संशोधनाची संस्कृती वाढवणे आहे. हा प्रतिष्ठित पुरस्कार जिंकल्याने श्री. लासुणे यांच्या ज्ञानाच्या प्रगतीसाठी आणि शैक्षणिक समुदायात प्रभावी संशोधनाला चालना देण्यासाठीच्या समर्पणावर प्रकाश पडतो.

१७ जानेवारी २०२५: स्वयंसिद्धी महाविद्यालयात संचालकांच्या नियुक्तीसाठी विषय तज्ज्ञ म्हणून डॉ. नीतिन जोशी यांना आमंत्रित करण्यात आले.

१९ जानेवारी २०२५: डॉ. नीतिन जोशी यांनी टाटा मुंबई हाफ मॅरेथॉनमध्ये भाग घेतला आणि ही स्पर्धा २ तास, २ मिनिटे आणि ४१ सेकंदात यशस्वीरीत्या पूर्ण केले.

२० जानेवारी २०२५: डॉ. नीतिन जोशी यांना सर एम. विश्वेश्वरय्या इस्क्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट मध्ये संशोधन विद्वानांच्या निवडीसाठी संशोधन तज्ज्ञ म्हणून आमंत्रित करण्यात आले.

२० जानेवारी २०२५ : सोमैया विद्याविहार विद्यापीठाच्या फॅकल्टी अँड स्टाफ डेव्हलपमेंट सेंटरने २० ते २४ जानेवारी २०२५ दरम्यान आयोजित केलेल्या 'इनोव्हेटिव्ह पेडागोजीज: ब्रिजिंग टेक्नॉलॉजी अँड इफेक्टिव्ह टीचिंग-लर्निंग प्रॅक्टिसेस' या विषयावरील फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राममध्ये यशस्वीरीत्या सहभागी झाल्याबद्दल आणि मूल्यांकनात अ श्रेणी मिळवल्याबद्दल डॉ. विभूती सावे यांना प्रशंसा प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.


SOMAIYA

Faculty & Staff Development Centre

CERTIFICATE OF APPRECIATION

Presented to

Dr. Vibhuti Save

'Innovative Pedagogies: Bridging Technology and Effective Teaching-Learning Practices'

Dr Preeti S Rawat

२१ जानेवारी २०२५ : विद्यार्थी विकास समिती तर्फे 'स्वरांजली' हा वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला आणि त्यांच्या संगीत प्रतिभेचे प्रदर्शन केले. याप्रसंगी गायन, युकेलेले, कीबोर्ड यांसारखी विविध वाद्ये वाजवणे अशा विविध सांगीतिक कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात आले.




२३ जानेवारी २०२५: डॉ. नीतिन जोशी यांना एस आय इ एस संस्थेने संशोधन विद्वानांच्या निवडीसाठी समिती सदस्य म्हणून आमंत्रित केले.

२३ जानेवारी २०२५: सहाय्यक प्राध्यापक अदिती दामले-पवार यांनी एस.के. सोमैया कॉलेजच्या प्लेसमेंट सेलतर्फे बी.कॉम आणि बी.ए. विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या एका आकर्षक कौशल्य सत्राचे नेतृत्व केले.

शैक्षणिक आणि व्यावसायिक यशातील अंतर कमी करण्यासाठी तयार केलेल्या या सत्रात खालील गोष्टींतूनच समावेश होता :

- ☞ सॉफ्ट स्किल्स आणि कम्युनिकेशन मास्टरी,
- ☞ व्यावसायिक देहबोली आणि आत्मविश्वास निर्माण
- ☞ स्ट्रॅटेजिक मुलाखत तंत्रे (करावे आणि करू नये)
- ☞ वास्तविक-जगातील परिस्थितीची तयारी आणि थेट प्रात्यक्षिके



२८ जानेवारी २०२५: मुंबई विद्यापीठाच्या अल्केश दिनेश मोदी इन्स्टिट्यूट फॉर फायनान्शियल अँड मॅनेजमेंट स्टडीज येथे आयोजित 'एमएमएस अभ्यासक्रम चर्चा सुधारणा' या विषयावरील संवाद बैठक आणि कार्यशाळेत डॉ. स्मिता जपे सहभागी झाल्या. डॉ. स्मिता जपे यांना वित्त आणि डॉ. विभूती सावे यांना 'सर्जनशीलता - डिझाइन थिंकिंग' या अभ्यासक्रमातील त्यांच्या योगदाना बद्दल प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले व अल्केश दिनेश मोदी संस्थेच्या संचालक डॉ. शुक्ला, यांनी त्याचे कौतुक केले.






२९ जानेवारी २०२५: डॉ. स्मिता जपे, डॉ. विभूती सावे आणि डॉ. महेश भानुशाली या तीन प्राध्यापकांनी तेलवणे पॉवर इक्विपमेंट्स प्रायव्हेट लिमिटेडसाठी सल्ला सेवा सुरू केली. त्यांच्या प्रक्रिया समजून घेण्यासाठी त्यांनी ठाणे-बेलापूर रोड येथील रबाळे येथील त्यांच्या प्रकल्पाला भेट दिली.



३० जानेवारी २०२५ : एमएमएस २०२४-२६ तुकडीचा प्रथम वर्षाचा विद्यार्थी यश एन. तेंडोलकर यांना बंट्स संघाच्या उमा कृष्णा शेट्टी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च येथे 'युनिकॉर्न्स स्टार्ट अप स्पार्क' स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.




•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

❉ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा

❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण

❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

Email : vpmt1935@gmail.com

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.